# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेली ग्रंथमाला




## भविष्यातली  वटपौर्णिमा?

# या अंकात


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | संपादकीय | | 3-4 |
| 2. | असलेपण- नसलेपण | उत्पल व. बा. | 5-14 |
| 3. | सुरांचा धर्म | संजय संगवई | 15-24 |
| 5. | मिल्ग्रम प्रयोग – विघातक आज्ञाधारकपणा | धनंजय मुळी | 25-33 |
| 7. | गांधी, मार्क्स, आंबेडकर: परस्परपूरकता शोधू या | सुरेश सावंत | 34-40 |
| 8. | चांगल्या कामांचा दुष्काळ | चतरसिंग जाम | 41-44 |
| 9. | दस्तावेज: गोहत्याबंदी आणि गांधीजी | - | 45-47 |
| 10. | कविता: पाणी मागतात, च्यायला | प्रदीप पुरंदरे | 48 |


**मुखपृष्ठावरील चित्र एका सामाजिक जाहिरात संस्थळाच्या सौजन्याने**


संस्थापक संपादक
**दि. य. देशपांडे**

संपादक
**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रकाशन – 3 मे 2016
प्रकाशकः भरत मोहनी, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.
मुद्रकः नितीन तापस, श्याम ब्रदर्स, एस.टी.स्टँड रोड, नागपूर-18.
किरकोळ प्रत – रु.30 फक्त



**संपर्कः**
रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ ravindrarp@gmail.com
editor.sudharak@gmail.com
भरत मोहनी bharat_i@yahoo.com (9822736808)



ही ग्रंथमाला संक्षिप्त स्वरूपात www.aajachasudharak.in वर प्रकाशित होते, संपूर्ण ग्रंथमाला मुद्रित पुस्तकाच्या स्वरूपात हवी असल्यास वर्षभरासाठी रु.300 व्यक्तीसाठी आणि रु.350 संस्थेसाठी पाठवून सभासद व्हावे. सभासद शुल्क मनीआर्डर अथवा पेयेबल अट पार चेक ने आजचा सुधारक, 201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-440010. येथे पाठवावे.

# संपादकीय

दिवस चर्चांचे आहेत. शेकडो माध्यमांतून हजारो विषयांवर चर्चा झडत आहेत व लाखो लोक त्यांत हिरीरीने भाग घेतानाही दिसत आहेत. पण त्यातील बहुतेक चर्चा त्याच त्या रिंगणात अडकल्याचे आपल्याला जाणवते. दुष्काळासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर बोलतानाही मुळात अवर्षण आणि दुष्काळ यांचा संबंध, माती व पाण्याचे नियोजन, समाजातील विविध घटकांचे परस्परसहकार्य व समन्वयन, पीकपद्धतीत बदल अशा महत्त्वाच्या मुद्यांकडे चर्चा सरकत नाही. लातूरला पाण्याची ट्रेन नेली जाते ह्याचे माध्यमांतून प्रचंड कौतुक केले जाते. पण अशी ट्रेन आपण किती ठिकाणी नेऊ शकतो, किती काळ असे पाणी पुरवू शकतो, कानाकोपऱ्यांत विखुरलेल्या खेड्यापाड्यांत पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठीच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था कशी करायची ह्या प्रश्नांची चर्चा घडतच नाही. ह्या वैचारिक साचलेपणाची चिकित्सा व्हायलाच हवी.

एकतर बहुतेक चर्चा ह्या बाजारशरण माध्यमांतून घडत असतात. त्यामुळे त्यांच्यावर बाजाराचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दडपण असते. आता बहुतेक सारीच माध्यमे बाजाराच्या प्रत्यक्ष दडपणाखाली येतील अशी चिह्ने दिसू लागली आहेत. पी साईनाथ ह्यांच्या मते येत्या पाच वर्षांत मुकेश अंबानी हे देशातील प्रत्येक पत्रकाराचे मालक झालेले असतील. अशा वेळी अंबानी, मल्ल्या ह्यांच्या उद्योगांनी सरकारी बँकांचे हजारो कोटी रुपये बुडवल्याच्या बातम्या बाहेर येणे अशक्यच होऊन बसेल. त्याचबरोबर सरकार व उद्योग ह्यांच्यावर अवलंबून न राहता छोटे छोटे समूह स्व-प्रयत्नांनी, सामूहिकतेची कास धरून आपले प्रश्न कसे सोडवू शकतात ह्याची उदाहरणे लोकांसमोर येणेदेखील बंद पडलेले असेल. ह्या सर्व प्रक्रियेला केव्हाच सुरुवात झालेली आहे,

कितीतरी बातम्या आपल्यापर्यंत पोहचतच नाहीत. कारण व्यवस्थेचे ‘ते’ रूप आपल्यापर्यंत यावे ही माध्यमांची इच्छा नसते. स्मार्ट सिटी व बुलेट ट्रेनच्या बातम्यांच्या पुरात भूमिगत गटारांचे काम करताना दर वर्षी हजारो कंत्राटी सफाई कामगार (तेही विशिष्ट जातीचेच) मृत्युमुखी पडतात ही बातमी बाहेर येतच नाही. नदी जोडणी प्रकल्पाच्या कौतुकात सरदार सरोवर प्रकल्पातील आर्थिक गैरव्यवहार ह्या विषयावरील सरकारी आयोगाचा अहवाल झाकला जातो. राजकारण हे अर्थकारणाचे सर्वात संपृक्त रूप आहे, हे ध्यानात घेतले की आजच्या भीषण परिस्थितीत जुने-नवे राजकीय नेते ऊस लागवड व मद्य-उद्योग ह्यांना पाणी पुरवठा करण्याचे समर्थन का करतात हे लक्षात येऊ शकते.

‘आजचा सुधारक’च्या ह्या अंकात आमच्या ह्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब पडलेले आपल्याला दिसेल. संजय संगवई ह्यांच्या लेखमालेचा उत्तरार्ध शास्त्रीय संगीताच्या इतिहासाकडे, किंबहुना भारताच्या सांस्कृतिक इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी आपल्याला देईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीच्या निमित्ताने देशभरात भरपूर लिखाण प्रकाशित झाले. पण त्यात ज्या प्रश्नांची चर्चा झाली नाही त्यांचा परामर्श सुरेश सावंत ह्यांनी आपल्या लेखात घेतल्याचे आपल्याला दिसेल. नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे ह्यांच्यातील महत्त्वाचे संशोधन व त्यांचे सामाजिक परिणाम ह्या विषयावरील लेखन सातत्याने प्रकाशित करण्याची आमची परंपरा धनंजय मुळी ह्यांच्या लेखातून पुढे जाताना आपल्याला दिसेल. सध्याच्या विमर्शातील डाव्या-उजव्या द्वंद्वाला छेद देणारा उत्पल व. बा. ह्यांचा लेख आत्मशोध व प्रतिवादाकडून संवादाकडे केलेला प्रवास ह्यांचे मनोज्ञ दर्शन घडवितो. राजस्थानातील एक ग्रामवासी चतरसिंग जाम ह्यांचा लेख तर भल्या भल्या अर्थशास्त्रज्ञांची व कृषितज्ज्ञांची भंबेरी उडवेल असा आहे.

आम्हाला भोवतालच्या परिस्थितीहून अधिक चिंता आमच्या वाचकांच्या संवादहीनतेची वाटते.

**[ टीप : *धर्म : परंपरा व परिवर्तन* ह्या विषयावरील लेखमालेचा पुढचा भाग ह्या अंकात जाऊ शकला नाही, तो पुढच्या अंकात प्रकाशित होईल. ]**

# असलेपण – नसलेपण

*उत्पल व. बा.*

रा. स्व. संघ, डावा विचार, गांधी

----------------------------------------------------------------------------

अलिकडे डावे-उजवे ह्यांच्यातील वैचारिक संघर्ष हातघाईवर आला आहे. अशा वेळी स्वतःला ‘डावा’ समजणाऱ्या एका तरुण कार्यकर्त्याने स्वतःशी व विरोधी विचारांशी संवाद करून आपली जडणघडण तसेच भारतीय समाजाची मानसिकता ह्यांचा शोध घेण्याचा केलेला एक प्रामाणिक प्रयत्न —

----------------------------------------------------------------------------

मी अलीकडे पुष्कळच विचार करतो. म्हणजे मी नक्की कसा आहे? माझ्याशी मतभेद असणारा नक्की कसा आहे? मी जे आग्रह धरतो ते आग्रह धरणं योग्य आहे का? 'मला हे पटतं' म्हणजे काय? 'पटत नाही' म्हणजे काय? मुळात योग्य काय आहे आणि अयोग्य काय आहे या 'डेंजर' प्रश्नाचं उत्तर आपल्याला सापडलं आहे का?

मी सर्वोदयी वडिलांचा मुलगा. आई 'मोमीन गर्ल्स हायस्कूल' या शाळेत शिक्षिका. लहानपणी वडिलांनी विनोबांची गीताई पाठ करून घेतली होती. त्यातलं फारसं काही न कळता ती पाठ केली होती. पुढे यथावकाश विसरलो. गांधीजी, विनोबा, जयप्रकाश, एसेम जोशी, तुकडोजी महाराज ही नावं कायम ऐकलेली. बाबांकडे जो चरखा होता त्यावर एकदा जवाहरलाल नेहरूंनी सूत कातलं होतं. त्यामुळे आमच्या घरी नेहरूंनी सूत कातलेला चरखा आहे ही मित्रांमध्ये मिरवण्याची गोष्ट होती. आईची शाळा मुस्लिम. तिच्या सगळ्या सहकारी शिक्षिका मुस्लिम. त्यांची मुलं-मुली आमचे मित्र-मैत्रिणी. इफत आपा, रजिया आपा, नजमा मावशी असा सगळा मावशी वर्ग अजून आठवतो. रोजे सोडण्याच्या दिवशी आम्हाला निमंत्रण असायचं. रंगीबेरंगी बिछायत आणि वर रसनेला चेतवणाऱ्या पदार्थांची मैफल. अस्सल

मुसलमान बघत नसेल इतकी आम्ही इफ्तारची वाट बघायचो ! पुण्यात, सदाशिव पेठेत वाढलेली आई नोकरीनिमित्त भिवंडीला गेली आणि तिथे तिने जो मुस्लिम गोतावळा जमवला तो रिटायरमेंटनंतर ती पुण्यात स्थायिक होऊन पंधरा वर्षं झाली तरी टिकला. अजून त्यांचे फोन होतात. काही वर्षांपूर्वी, निवृत्तीनंतर आईचं एक ऑपरेशन झालं तेव्हा झाडून सगळ्याजणी भेटायला आल्या होत्या. आईच्या सोसायटीने इतक्या बुरखेवाल्या बायका प्रथमच पाहिल्या असतील. आईच्या शाळेची इमारत, मुख्याध्यापक बाईंचं प्रशस्त केबिन, तिथले वर्ग हे सगळं नीट आठवतं. मी शाळेत जायचो ते 'परशुराम रामनारायण विद्यालय' होतं. 'ब्राह्मण आळी' असं स्पष्ट नाव असलेल्या भागात वसलेलं. (तिथून जवळच वाणी आळी होती. एकूणात नावं ठेवताना मोकळेपणानी ठेवली होती.) १९८४ सालच्या दंगलीत मी सात वर्षांचा होतो. तेव्हाचं फारसं काही आठवत नाही. वडील दंगलग्रस्त भागाला भेट द्यायला गेले होते आणि त्यांना उशीर झाला म्हणून चाळीतले सगळे काळजीत होते हे आठवतं. पुढे १९९२ साली दहावी होऊन पुण्याला आलो. पण दंगलीनंतरही आमच्या रुटीनमध्ये काही फरक पडला नव्हता. सगळ्या मुसलमान मित्रांशी मैत्री कायम होती. ज्या मारामाऱ्या व्हायच्या त्या सायकलची राइड, अमुक मुलीशी ओळख करून देत नाहीस वगैरे निष्पाप कारणांमुळे.

पुण्याला आल्यावर जाणवलेली पहिली गोष्ट म्हणजे इथे लोकांना हिंदी (नीट) बोलता येत नाही. भिवंडीसारखी अस्वच्छता, यंत्रमागांचा आवाज नाही, ऐसपैस रस्ते आहेत आणि स्वच्छता आहे हे जाणवलंच, पण हिंदीची कमतरताही जाणवायची. हिंदी न येणारे लोकही असतात असा साक्षात्कार पुण्यात आल्यावर झाला. अर्थात त्याचीही सवय झाली. पुण्याचं पुणेरीपणही हळूहळू आत्मसात होतं. (ते न व्हायची शक्यता नव्हतीच. 'हे बघ, बाहेरचे कुणी आले ना, तर या लहान ग्लासात सरबत द्यावं. काही बिघडत नाही' अशा आयडियॉलॉजीच्या आजीबरोबर राहत होतो.)

हिंदू-मुस्लिम ही काय भानगड आहे, जातींची लफडी काय असतात हे खरं तर कधी लक्षातच आलं नव्हतं. अर्थात ते नसणार अशातला भाग नाही. पण ते आमच्यापर्यंत पोचत नव्हतं हे खरं. मुळात सर्वोदयी घरातला असलो तरी चळवळीशी संबंध उशीरा आला. म्हणजे मेनस्ट्रीम शिक्षण घेऊन, एमबीए वगैरे करून, काही वर्षं नोकरी करून मग जाणवलं की आपल्याला जे सारखं बोअर होतंय

त्याचं कारण आपल्या गुणसूत्रांमध्येसुद्धा आहे. नोकरी वगैरे कामं आपली नव्हेत. पण या शिक्षण, नोकरीमुळे जात-धर्म वगैरेशी संबंध आला नाही. पुढे 'मिळून साऱ्याजणी'त दाखल झाल्यावर हे सगळे विषय समोर आले. पुण्याबद्दल जाणवलेली दुसरी गोष्ट म्हणजे इथले बरेचसे लोक गांधींचा मनापासून द्वेष करतात ही. भिवंडीतही थोडासा गांधीद्वेष अनुभवला होता. आमचे समाजशास्त्राचे शिक्षकच गांधीद्वेष्टे होते. 'गांधी तसेही म्हातारे झाले होते, त्यांना मारून खरं तर चूकच केली नथुराम गोडसेनं' असं ते म्हणायचे. पुण्यात आल्यावर अनेक अनोळखी गोष्टींचा परिचय झाला तसाच याही गोष्टीचा झाला. गेल्या एक-दोन वर्षात हे प्रमाण जास्त वाढलं. गांधींचा राग करणारे बरेचजण दिसले.

### प्रतिवाद नव्हे, संवाद

मला गांधींच्या बरोबरीने ज्या इतर तिघांनी प्रभावित केलं ते म्हणजे आंबेडकर, मार्क्स आणि डार्विन. आणि हे तिघेच असं नाही, तर यांनी जी मांडणी केली ती पुढं नेणाऱ्या, त्याची चिकित्सा करणाऱ्या अशा अनेकांनी. न्यूटन, आईन्स्टाइन आणि मंडळींपुढेदेखील अवाक व्हायला झालं. म्हणजे ही माणसं काय प्रतीचा विचार करू शकतात! शास्त्रज्ञ, डॉक्टर, महाकाय कल्पनांना मूर्त रूप देणारे तंत्रज्ञ यांच्याविषयी मला कमाल आदर आहे. शस्त्रक्रिया करणारे सर्जन वगैरे तर मला बॅटमॅनच वाटतात. गांधींची चिकित्सा आंबेडकरांनी करणं पटत होतं, पण चहा पिता पिता गांधींवर हल्ला करण्याची क्षमता असलेले लोक भेटले की मौज वाटायची. अजूनही वाटते. आधी गडबडून जायला व्हायचं. पण तरी मी एक ठरवलं होतं की आपण प्रतिवाद करायचा नाही. प्रत्येक वेळी शांत राहणं जरा कठीणच गेलं, पण आता मी ते कौशल्य साध्य केलं आहे. गांधींची कितीही मानहानी केली किंवा कितीही उजवेपणाने कुणी बोललं तरी मी प्रतिक्रिया देत नाही. कारण मला एक जाणवतं की ही सगळीच माणसं माणूस म्हणून काही वाईट नाहीत. दुसरं महत्त्वाचं असं की त्यांचं वाचन, स्वतःचं चिंतन असं काही नसतं. अशा वेळी त्यांच्याशी वाद तो काय घालणार? शिवाय गांधीजींना नावं ठेवून गांधीजींचं मोठेपण कमी होत नाही ही अनेक वेळा सिद्ध झालेली गोष्ट आहे. आणि असे वैचारिक मतभेद सोडले तर आपण सगळेच दिवसभराच्या ओझ्याचे बैल आहोत हेही जाणवतं. बँकेचे हप्ते भरायला या मित्रांच्या मदतीला जानवं, यज्ञयाग

यातलं काहीही येत नाही आणि माझ्या मदतीला मार्क्सची विद्वत्ता येत नाही. डावे असा की उजवे, तुम्ही या जगात फक्त पॅनकार्ड धारक असता हे उमगलं होतं ! गोविंद पानसरेंचा खून झाल्यावर आमच्या एका परिचितांनी कम्युनिस्टांनी केलेल्या कत्तलीचं काय असा प्रश्न उपस्थित केला होता. तेव्हाही मी काही बोललो नाही. कारण वर म्हटलं तसं एक पक्कं ठरवलं होतं, आणि आहे, की आपण सर्व विरोध शांतपणे ऐकायचा. कारण आपल्याशी सहमत होणाऱ्या लोकांपेक्षा आपल्यावर टीका करणारे आपल्याला पुनर्विचार करायची संधी देत असतात. दुसरं असं की विरोधाचा तो जो क्षण असतो तो नाजूक असतो. त्याक्षणी बोलून काही उपयोग होत नाही. तुम्हाला तुमचं म्हणणं शांत राहून, सौहार्द न तोडता सांगण्याशिवाय पर्याय नसतो. कारण परस्पर सामंजस्याचा तोच एक मार्ग आहे. तुम्हाला तुमची मांडणी करण्याचे वेगळे प्रभावी पर्याय शोधावे लागतात.

'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे नाटकदेखील मी पाहिलं होतं. त्यातली एक चांगली गोष्ट म्हणजे त्यात गांधींचं सादरीकरण 'कॅरिकॅचर' म्हणून केलेलं नव्हतं. मतभेद आहेत ते आहेतच, राहतीलच, पण नाटकावर बंदी घालावी असं मला वाटत नव्हतं. पुलंच्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकात एक प्रसंग आहे. सामाजिक कार्यकर्ता असलेली उषा, गीता आणि सतीश या दोघांबरोबर सिनेमाला जाते तेव्हा एका वृत्तपत्रात ही बातमी 'शिबिरात स्वयंसेविका आणि थेटरात संचालिका' अशा मथळ्याने छापून येते. शिबीरसंचालक बाई शिबिरात कित्येक दिवस गेलेल्याच नाहीत आणि सिनेमागृहात दिसल्या यावर हा रोख असतो. काकाजी त्यावर म्हणतात, ठीक आहे. तुम्ही लोकांना सारखं काहीतरी पढवत असता ना, तसं एक दिवस या संपादकाने तुम्हाला पढवलं तर काय हरकत आहे? मला उद्या कुणी म्हटलं की तू नेहमी दूधभात, भेंडीची भाजी खा तर मी त्यांना म्हणेन तू मटन पॅटिस आणि बिर्याणी खा. क्विद्व ! दोघांचंही बरोबर !! मला टीका ऐकताना हे उदाहरण नेहमी आठवतं. गांधी जसे मला प्रिय आहेत तसे कुणालातरी गोळवलकर प्रिय आहेत हे आधी मला स्वतःशी नीट मान्य करावं लागतं. मी अशी एक समतानता स्वीकारली की मग पुढचं थोडं सोपं होतं. (अर्थात 'पढवणं' याचा अर्थ मारून टाकणं असा नव्हे. पण ज्यांचा हिंसेवर विश्वास आहे अशांशी अहिंसक वगैरे होऊन संवाद करायचा विचार मी करतोय खरा.)

'मार्क्सवादाची तोंडओळख' या पुस्तकात गोविंद पानसरे यांनी दृष्टिकोनातील तात्त्विक फरकाविषयी चांगली मांडणी केली आहे. आपल्याला असं लक्षात येईल की आपण जेव्हा डावे असतो, उजवे असतो, सेंटरला असतो किंवा सेंटरच्या डावीकडे अथवा उजवीकडे असतो आणि दुसऱ्याशी वाद करत असतो तेव्हा त्याच्या मुळाशी तात्त्विक संघर्ष असतो. आपल्या मुद्यांवरील सगळी आवरणं दूर केली की मुळाशी तात्त्विक मतभेद दिसतो. तत्त्वज्ञान ही गोष्ट रटाळ वाटली तरी आपल्या विचारामागे, कृतीमागे तत्त्वज्ञान अदृश्य रूपात कार्यरत असतंच. डाव्या आणि उजव्या विचारांचा विचार करताना मला हे प्रकर्षानं जाणवतं.

**‘डावा’ असणे म्हणजे काय?**

'डाव्या विचारांचा आहे' म्हणजे मी कसा आहे? मला जाणवतं ते हे की मला किंवा समविचारी इतरांना मुख्य प्रवाहातील बहुतेक गोष्टींचा कंटाळा असतो. मला तर अलीकडे 'ॲनी हॉल' मधल्या वुडी ॲलनसारखं 'इनकॅपेबल टू एन्जॉय एनीथिंग' असं आपलं झालंय का असं वाटतं. कारण तळाशी डावा विचार जागा आहे. मग लग्न-मुंजीचं आमंत्रण आलं की पोटात गोळा येतो. नातलगांमध्ये मन रमत नाही. कधीकधी घरातही मन रमत नाही. गणपती, नवरात्र, दसरा, दिवाळी, होळी, रक्षाबंधन, संक्रांत, आंबेडकर जयंती, शिवजयंती यातलं काहीही आलं की ते लवकर जातं कधी याचीच मी वाट बघतो. कुठल्याही प्रतीकात्मक गोष्टींमध्ये मला रस उरत नाही. पण दुसरीकडे हे सगळं साजरं करणाऱ्या समाजातच मी राहात असतो. हे साजरं करणारे लोकच समाजाचा गाडा ओढत असतात. त्यांच्या सेवांचा लाभ मी घेत असतो. पैसे देऊन घेत असतो, पण घेत असतो. 'तो माझ्यासारखा नाही' म्हणून त्याची सर्व्हिस मी नाकारत नाही.

पण मग मला आवडतं काय? मला उलटसुलट विचार करायला आणि प्रश्न विचारायला आवडतं. आणि यातून आसपास जे सुरू आहे त्याचा किंवा जे सौंदर्य मला दिसतं आहे त्याचा आस्वाद घ्यायची माझी कुवत कमी होते. ती संपते असं नाही, पण मला आनंद देणाऱ्या गोष्टींपेक्षा मला बोअर होणाऱ्या गोष्टी नेहमीच जास्त असतात. यातून एक धोका उद्भवतो. 'मला काहीतरी समजलंय' किंवा 'मला जास्त

कळतं' या जाणिवेतून माझ्यात एक सूक्ष्मसा अहंकार येतो. मी माझ्या भवतालापासून डिसकनेक्ट होतो.

दुसऱ्या बाजूला, म्हणजे 'उजवीकडे' एक समर्पण अपेक्षित आहे. तिथे विचारकलहाला फारसं स्थान नाही. परंपरा, श्रद्धा, यांना स्थान आहे. शक्यता अनेक असू शकतात आणि प्रत्येक शक्यतेची स्वतंत्र चिकित्सा होऊ शकते हा विचार तिथे फारसा नसतो. तिथे कृतीचं महत्त्व आहे. म्हणजे सत्यनारायणाची पूजा का करायची किंवा देवापुढे आरती म्हणण्याचं प्रयोजन काय या प्रश्नांना तिथे स्थान नाही. 'संघातले दिवस आणि इतर लेख' या पुस्तकातील 'संघातले दिवस' या लेखात स. ह. देशपांडे यांनी गंगाधर गाडगीळ यांची एक आठवण सांगितली आहे. गाडगीळ अमेरिकेत गेले असताना त्यांनी योगसाधनेविषयी एक भाषण दिलं आणि मनःशांती, मोक्ष, निर्वाण ही योगसाधनेची उद्दिष्टे असतात असं सांगितलं. भाषण संपल्यावर एका अमेरिकन स्त्रीने विचारलं, "किती दिवस साधना केल्यावर निर्वाणप्राप्ती होते?" हा अनुभव पुढे एका व्याख्यानात सांगताना गाडगीळ म्हणाले, "हा प्रश्न भारतीय व अमेरिकन मनोवृत्तीतील फरक स्पष्ट करणारा आहे. भारतीयांना हा प्रश्न हास्यास्पद वाटतो. कारण योगसाधनेचं आकर्षण आपल्या दृष्टीनं तिच्या धूसर उद्दिष्टातच असतं." स. ह. देशपांडे पुढे लिहितात, "उद्दिष्टांपासून सर्वस्वी तोडलेल्या आचारांची आपल्याला सवय आहे. कार्यापेक्षा कार्याभास आपल्याला प्रिय आहे."

### संघ समजून घेताना

'संघातले दिवस' हा लेख फार वाचनीय आहे. वयाच्या चौदा ते बावीस वर्षांपर्यंत स. ह. देशपांडे संघात होते. या दिवसांचं प्रांजळ चित्रण त्यांनी या लेखात केलं आहे. संघाची संघटनात्मक बाजू जमेची आहे हे सांगताना 'संघानं नुसतं बौद्धिक दारिद्र्यच नव्हे तर वैचारिक असहिष्णुताही पत्करली' असंही ते नमूद करतात. (पृ. ३६) त्यांच्या संघातील काळात त्यांनी एकदाही जात किंवा ब्राह्मण हा शब्द ऐकला नाही असं त्यांनी म्हटलं आहे. संघाने ब्राह्मणेतरांना हेतुपूर्वक अव्हेरलं असं त्यांना वाटत नसल्याचं ते लिहितात. यासंदर्भात त्यांचा पुढचा मुद्दा महत्त्वाचा आहे - 'जातिप्रथेच्या दुष्परिणामांचे व्यापक सामाजिक आकलन करून घेण्याचा संघाने प्रयत्न केला नाही

आणि संघशाखेबाहेर कसलीही हालचाल केली नाही. म्हणजे एका अर्थाने त्याने हिंदुसंघटनही केले नाही.' (पृ. ४५)

मी तटस्थपणे दोन्ही बाजू पाहिल्या की एक गोष्ट मला निःसंदिग्धपणे लक्षात येते ती ही की 'केवळ डावा आहे म्हणून बरोबर आहे' हे साफ चूक आहे, पण 'आशा आहे ती डावीकडेच आहे' हेही खरं आहे. कारण हा चिकित्सक विचार आहे. म्हणजे अगदी कट्टर उजवादेखील जेव्हा चिकित्सा करतो, प्रश्न विचारतो तेव्हा तो डावाच असतो. डावा विचार हा मोठ्या, व्यापक पटलावरचा विचार आहे. धर्म, राष्ट्र, संस्कृती या सीमांनी तो बांधलेला नाही. जगभराचा मानवी इतिहास काय आहे, जगातील सामाजिक-राजकीय-आर्थिक व्यवस्थांचा विकास कसा झाला आहे, माणसाच्या दुःखाचं ऐहिक मूळ काय आहे, माणसापुढे नैतिक स्वरूपाच्या समस्या कोणत्या आहेत याचा सखोल विचार इथे झाला आहे, होत असतो. सामाजिक घटकांचा परस्परसंबंध कसा आहे, तो कसा असायला हवा याची संकल्पनात्मक मांडणी या विचाराने केली आहे. मी माझ्यापुरता तरी डावा विचार म्हणजे सगळाच आधुनिक विचार, 'शोधकेंद्री' विचार धरतो. मग यात लोकायत विचार, बौद्ध-जैन विचार आले, फुले, गांधी, मार्क्स, आंबेडकर, आगरकर, राममोहन रॉय, र. धों. कर्वे, मानवेंद्रनाथ रॉय, विनोबा, जयप्रकाश नारायण, सिमों द बुवा, रिचर्ड डॉकिन्स - असे सगळेच आले. जे जे मुळाशी भिडू शकतं ते मी डावं आणि म्हणूनच आश्वासक समजतो. त्यामुळे डावे स्वप्नरंजनात रमतात हे जरी खरं असलं तरी विश्लेषणाची उत्तम पद्धत कुठली असेल तर ती डावी पद्धत!

स. ह. देशपांडे यांनी संघावर केलेल्या अचूक मांडणीसोबत भारतीय मानसिकतेवरही प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात :

"शेकडो कार्यकर्त्यांनी संघासाठी आपली उमेदीची वर्षं दिली. कित्येकांनी आपलं सर्वस्व दिलं. काहीतरी करावं अशी ज्यांची तडफड होती त्यांचा भ्रमनिरास झाला, १९४६ साली अप्पा पेंडसे, वसंत गीत, मधु देवल, दि. वि. गोखले, राजा वाकणकर इत्यादी दहाबारा अस्वस्थ आत्मे एकत्र आले आणि संघात कधीही न घडलेली एक गोष्ट त्यांनी केली. ते गुरुजींना जाऊन भेटले व त्यांनी नवीन विधायक दिशेचा आग्रह धरला. गुरुजींनी नकारघंटा वाजवली.

पण संघाच्या निष्क्रियतेवरही ज्यांची निष्ठा होती असे अनेक स्वयंसेवक संघात होते हे विसरता येत नाही. खरोखरच आपल्याला राजकारणात भाग घ्यायचा नाही, आपलं कार्य अधिक मूलभूत आहे, ते राष्ट्रीय चरित्र निर्माण करण्याचं आहे किंवा संस्कृतिसंवर्धनाचं आहे याची बालंबाल खात्री असलेले अनेक स्वयंसेवक संघात होते. आणि या आभासाखातर आपल्या सर्वस्वाचा होम करणारे कार्यकर्तेही होते. अजूनही आहेत.

याचं स्पष्टीकरण काय? पारंपरिक भारतीय मनोवृत्तीचं प्रतिबिंबच या घटनेत पडलेलं असावं का? भारतीय मनाला 'वास्तवाची अभिरुची' नाही असं डॉक्टर सहस्त्रबुद्धे म्हणत असत. त्याचाच हा एक परिपाक आहे काय? हे म्हणणं खरं असावं. धर्म हा 'अदृष्टफल' असतो अशया परंपरेचे आपण पाईक. किंवा 'फलाशारहित' कर्म करण्याच्या. जे उद्दिष्ट मूर्त स्वरूपात दिसत नाही त्याची गूढता, रहस्यमयता आपल्याला आकृष्ट करते. ते मूर्त होऊ लागलं की त्याच्या भोवतालचं मोहक आवरण गळून पडतं. म्हणून प्रत्यक्ष वस्तुगत प्रश्नांशी झुंज घेणं हा आपला स्वभाव नाही. आपण 'प्रॉब्लेम सॉल्व्हर्स ' नाही. "(पृ. ४२-४३)

हे वाचत असताना 'संघात असलेल्या माणसानेच हे लिहिलं ते बरं झालं' असं तर न राहवून वाटलंच, पण तिसऱ्या परिच्छेदातलं भाष्य उजव्यांइतकंच डाव्यांनाही वेगळ्या संदर्भात लागू आहे का असंही वाटलं. मात्र मी आधी म्हटलं तसं आशा असेल तर ती डावीकडे आहे हे खरं आहे. आपण 'प्रॉब्लेम सॉल्व्हर्स' नाही हे अगदी विनातक्रार मान्य करण्यासारखं असलं तरी जो काही प्रयत्न झाला आहे, होतो आहे तो डावीकडूनच होतो आहे हे मान्य करावं लागेल. मुळात 'प्रॉब्लेम आयडेंटिफिकेशन'च डावीकडून होतं. म्हणून तर 'हिंदू राष्ट्र झालं की सगळे प्रश्न संपतील' हा भाबडेपणा डाव्यांमध्ये नाही. आपला प्रॉब्लेम काय आहे हे उजव्यांना कळलं आहे असं मला वाटत नाही. आणि तरी ते सोल्यूशन मात्र देत आहेत.

संघाचं नियोजन, संघटना बांधणी, संस्थात्मक उभारणी हे सगळं समाजवाद्यांनी धडे घ्यावेत असं आहे. संघाचं सेवाकार्य अतिशय स्पृहणीय आहे. पण व्यवस्थेतील दोषांचं काय? 'मी गरिबांना अन्न दिलं की मी संत होतो, पण मी जेव्हा गरीब गरीब का आहेत असं विचारतो तेव्हा ते मला कम्युनिस्ट म्हणतात' असं एक प्रसिद्ध वचन आहे. मी डावीकडे झुकतो कारण माझ्या मनात प्रश्नांची साखळी निर्माण करण्याची

क्षमता या विचारात आहे. मला ही विचारसरणी हताशही करेल, माझी गुंतागुंत वाढवेलसुद्धा - पण तेच तर अपेक्षित आहे. 'जो तो आपलं नशीब घेऊन येतो' या सुतासारख्या सरळ उत्तरापेक्षा अनेक धाग्यांचा गुंता समोर ठेवणं मला योग्य वाटतं. कारण आपलं जगणं, आपली व्यवस्था हे सगळं गुंतागुंतीचंच असतं. उजवा विचार किंवा कोणताही स्थितिवादी विचार जेव्हा सगळं झटकन सोपं करून टाकतो तेव्हा मला गंमत वाटते.

रावसाहेब कसबे यांनी त्यांच्या 'झोत'मध्ये एक आठवण सांगितली आहे. 'झोत' हे त्यांचं संघाची चिकित्सा करणारं गाजलेलं पुस्तक. पुस्तक प्रकाशित झाल्यावर अपेक्षेप्रमाणे त्यावर अनेक उलटसुलट प्रतिक्रिया आल्या. मधुसूदन रामचंद्र जोशी या चिंचवडच्या तीस वर्षे संघात असलेल्या स्वयंसेवकाचं त्यांना पत्र आलं. 'झोत' समजायला कठीण आहे असं म्हणून त्यांनी लिहिलं होतं, "एवढा का हो समाजवाद अवघड आहे? हा भारतात कसा यायचा? संघ समजायला सोपा. राखी बांधा, मैत्री वाढवा...".

हे उदाहरण बोलकं आहे. ज्यांना खोलात जायचं नाही आहे त्यांच्यासाठी संघ ठीकच आहे, पण ज्यांना खोलात बुडी मारायची आहे त्यांना संघात रमता येईल का याची मला शंका आहे. आर्थिक संरचना, उत्पादन-वितरणाची साखळी याला धक्का न लावता, माणसाच्या मूलभूत स्वार्थी प्रवृत्तीला व्यापक उद्दिष्टांसाठी 'मोल्ड' करायचा प्रयत्न न करता, आहे तीच व्यवस्था मान्य करून, या व्यवस्थेतील लोकांना राष्ट्रवाद आणि धर्माच्या आधारे एकत्र आणण्याचं काम संघाने केलं. यात त्यांनी मजबूत संघटना उभारली. डावी चळवळ इथे कमी पडली हे खरं आहे. संघाची स्थापना १९२५ सालची आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापनाही १९२५ सालचीच. पण संघाने जी संस्थात्मक उभारणी केली ती डाव्यांना करता आली नाही. म्हणजे ट्रेड युनियनच्या माध्यमातून खूपच प्रयत्न झाले, पण ज्यांच्याकरता संघर्ष करायचा त्यांना दुसरी पर्यायी व्यवस्था दिसली नाही की त्यांचा धीर सुटतो. 'कारखाना कम्युनिस्टानेच काढावा' असं म्हणतात, पण कम्युनिस्टांनी कारखाना काढल्याचं ऐकिवात नाही!

संघ या देशात मजबूत झाला याची जबाबदारी डाव्या समाजवाद्यांवर येऊन पडते कारण त्यांना पर्यायी विचार प्रभावीपणे पोचवता आलेला नाही, तसं प्रत्यक्ष कार्य करता आलेलं नाही असं कसबे यांनी 'झोत'मध्ये म्हटलं आहे. हे अगदी बरोबर आहे.

पण मला पुढे जाऊन असंही वाटतं की धर्म, जात, श्रद्धा, परंपरा या गोष्टी या देशाच्या डीएनएमध्येच आहेत. मुळात 'प्रॉब्लेम आहे, बदल हवा आहे' हे डावं मत आहे. आम जनतेला बदल नकोच आहे. सर्व प्रॉब्लेम्ससकट, श्रद्धायुक्त अंतःकरणाने जगणे हे जनतेचं साधारण सूत्र आहे. जनतेला मार्क्स काय म्हणतो यात रस नाही, जनतेला आकाशातल्या बापाचं वेड आहे. जनतेला आंबेडकर काय म्हणतात यातही रस नाही, त्यांना आंबेडकरांची पूजा बांधण्यात रस आहे. मंदिर बांधण्याची कल्पना त्यांना एकत्र आणू शकते, एकत्र चळवळ उभारायची कल्पना नाही. व्यक्तिस्वातंत्र्य, विज्ञान, तर्क या गोष्टी जनतेला कंटाळवाण्या वाटतात. त्यांना झी मराठीवरील मालिकाच बघायची असते. अमेरिकेतला पंचीविशीच्या आतला युवक फेसबुक निर्माण करतो आणि भारतात त्यातून 'इंस्टंट ऑनलाइन दहशतवादी' तयार होतात, जातींचे ऑनलाइन गट निर्माण होतात. धर्माधारित राष्ट्राचा विचार लोकांना आवडतो, पण विज्ञानाधारित जीवन ही कल्पना त्यांना समजू शकत नाही. इथे भावना 'प्रधान' आहे, विचार अधूनमधून ललकारी देण्यापुरते आहेत.

मी निराश होऊन बोलत नाही आहे. मला जी वस्तुस्थिती दिसते आहे ती साधारण अशी आहे. परिवर्तनाचा विचार इथे का रुजत नाही याचा विचार करताना मनात येणाऱ्या या गोष्टी आहेत. हा इथला जुनाच पेच आहे. याचा अर्थ या समाजात काहीच बदल घडले नाहीत असं अजिबात नाही. पण आपली नाळ इथे का जुळत नाही हे कळत नाही. त्यामुळे या समाजाचं काय करायचं याहीपेक्षा या समाजात आपण कुठे आहोत आणि आपण आपलं काय करायचं असा प्रश्न पडतो आहे!

**ईमेल:** utpal.vb@gmail.com

**पूर्वप्रसिध्दी**: मीडिया वॉच (दिवाळी २०१५)

***

# सुरांचा धर्म (२)

*संजय संगवई*

भारतीय संगीतपरंपरा, सूफी, हिंदू-मुस्लीम संबंध

---------------------------------------------------------------------------

धार्मिक उन्मादाच्या आजच्या वातावरणात भारताची ‘गंगा-जमनी’ संस्कृती, सर्व धर्मीयांचा सामायिक वारसा म्हणजे काय हे नीट उलगडून दाखविणाऱ्या, मुस्लीम संगीतकारांनी व राज्यकर्त्यांनी भारतीय संगीताला नेमके काय योगदान दिले हे साधार नमूद करणाऱ्या करणाऱ्या लेखाचा हा उत्तरार्ध -

---------------------------------------------------------------------------

इब्राहिम आदिलशाह अकबर बादशहाचा समकालीन होता. अकबर शेख सलीम चिश्तीचा भक्त होता. पुढे तो सूर्यपूजक झाला. फक्त वीस वर्षांचे असताना अकबराने रीवा संस्थानचे राजे रामचंद्रांच्या पदरी असलेल्या तानसेनाला मोगल-दरबारात आणले. तानसेनाला त्याने `कण्ठाभरणवाणीविलास’ ही उपाधी देऊन त्याचा सन्मान केला. त्याच्या दरबारात `रामसागर’ ग्रंथाची रचना झाली. अकबर हा अत्यंत सुसंस्कृत राजा होता. बुद्धिमान होता. आपल्या जाणिवेचा विकास पंडितांच्या सहवासाने करण्याबरोबरच, अनेक कलावंतांना रागाबाबत नवे प्रयोग करण्याची त्याने प्रेरणा दिली. तानसेनाची `मियां की तोडी’, `मिया मल्हार’, रामदासचा `रामदासी मल्हार’ सूरदासाचे सूरदासी मल्हार (मलार) धोंडू नायकाच्या धोंडूजी की मलार इत्यादी रागांची निर्मिती त्याच्या दरबारात झाली असावी. बृहस्पतींच्या मते मशहद व इराणी कलावंत अकबराच्या दरबारात होते. त्यांचाही सहवास भारतीय रागनिर्मितीस सहायक झाला असावा. संगीत-रत्नाकर साङ्गदेवाच्या `संगीत-रत्नाकरावर’ बरीच चर्चा दरबारात होत असे. अकबराने पुढे सर्व धर्मांतील  उत्तम तत्त्वांचा दीन-ए-इलाही धर्म स्थापन केला. मात्र त्याचे फारसे प्रचलन झाले नाही. मुद्दा असा की हा माणूस आपल्या कट्टरपंथीय समधर्मीपेक्षा वेगळा होता व भारतीय होता.

तसे बाबरापासून सवर्च मुघल-खानदान रसिक व साहित्य-कलागुणांची कदर करणारे होते. ज्या बाबराच्या नावाने `तेल लगाओ डाबर का, नाम मिटाओ बाबर का' यासारख्या स्तरावरून घोषणा देण्यात येतात, तो बाबर हा सतत संघर्षात असून आत्मपरीक्षण करणारा लेखक-कवी होता. त्याच्या `बाबरनामा'मध्ये तपशिलापेक्षा स्वतःला प्रश्न विचारणाऱ्या, स्वतःबद्दल शंका असणाऱ्या मनाची आंदोलने दिसतात. त्या काळात हस्तलिखित नकललेली पुस्तके सोन्याच्या भावात मिळत. बाबर आपल्या सगळ्या स्वाऱ्यांमध्ये कुठून कुठून अशी हस्तलिखिते जमा करीत असे. समरकंद, काबूल, दिल्ली या ठिकाणी बाबराने पुस्तकालये उभी केली. त्याचे अनेक सरदार-साथीदार लूटमार करून संपत्ती जमवल्यावर समरकंद, काबूलला परत गेले. मात्र बाबर म्हणत असे की मी हिंदुस्थान ओरबाडून घ्यायला आलो नाही. मी इथेच राहणार. म्हणून अनेक प्रियजनांचा विरह सहन करून तो दिल्ली, फतेपूर-सिक्री इत्यादी ठिकाणी राहिला. राजपुतांविषयी, हिंदू-धर्माविषयी निरीक्षणे नोंदवत त्याने राजपुतांशी मैत्री वाढवली व हिंदू धर्मीयांचा आदर केला. बाबराने हुमायूनला ताकीद दिली की हिंदू मंदिरांना हात लावू नये, उलट त्यांना मदतच करावी. आपल्या या मुलखात, या देशात, येथलेच होऊन रहायचे हा बाबराचा आग्रह अनेक पत्रांतून, बाबरनाम्यातून दिसून येतो.

## सामाईक संस्कृतीची निर्मिती

या मुघल-परंपरेत अकबरानंतर जहांगीर (सलीम), शहाजहान यांनी संगीताला उत्तेजन दिले. जहांगीर हा संगीताच्या प्रत्येक अंगात निपुण होता व भारताच्या, मतंगाच्या मतांची चिकित्सा करणारा होता, असे एका धृपदात म्हटले आहे. शहाजहानच्या दरबारात बिलासखान, गुनसमन्तरखान, बिसरामखान, रंगखान, किशनखान असे गायक होते. औरंगजेबचा मोठा भाऊ दारा-शिकोह हा भारतीय दर्शनांचा अभ्यासक होता. काही उपनिषदांचे फारसीत अनुवाद करणे किंवा स्वतःच `अल्लोपनिषद्' सारख्या रचना त्याने केल्या. दाराला ठार करून गादीवर आलेला औरंगजेबदेखील संगीताचा चाहता होता. बादशहा झाल्यावर पहिली आठ-नऊ वर्षे तो संगीतात रस घेत होता. त्याने रचलेली काही धृपदे ही

डागर गायकी परंपरेत गातात. औरंगजेबाचा सेवक मिर्जा रोशनजमीरने 1666 मध्ये अहोबलाच्या `संगीत पारिजाता'चा अनुवाद केला. फकीरउल्लाने मानसिंग तोमरने संगृहीत केलेल्या `मानकुतूहल' ग्रंथाचा `रागदर्पण' हा अनुवाद केला. पुढे औरंगजेबाने 1667-68 मध्ये गायकांनी दरबारात यावे पण गाऊ नये असा हुकूम दला, तो सर्वस्वी राजकीय कारणांसाठी.

या सर्व काळात मुस्लिम म्हणून या शासकांनी भेदभाव, दुय्यमता, अत्याचार यांचा आश्रय घेतला होताही. मात्र आधीच्या लुटारू सुलतानांप्रमाणे इथल्या बहुसंख्य असलेल्या हिंदुधर्मीयांशी टोकाचा वैरभाव त्यांनी घेण्याचे टाळले – कारण बाबराच्या भाषेत, त्यांना याच देशात राहायचे होते. त्यांचा दुसरा मुलूख नव्हता. बादशहा-सुल्तानांच्या जुलमाचा फटका हिंदू व मुस्लिम अशा दोन्ही नागरिकांना बसत होता. याच काळात मुस्लिम राज्ये मुस्लिम सुल्तानांच्या विरोधातही लढली; कट कारस्थाने केली. हा सवर्च काळ राजकीय-सामाजिक खळबळीचाही होता. या सर्वांत अनेक जुने बंध ढिले पडत होते, नवी रूपे तयार होत होती. मुस्लिम व हिंदू जग यांची रूपेही बदलली होती. वेगवेगळ्या गडद-धूसर सीमारेषा असल्या तरी सामाईक संस्कृती (सांझी संस्कृती)चे क्षेत्रही तयार होत होते. शास्त्रीय संगीत हे त्या सामायिक वारशातील एक महत्त्वाचा भाग बनत होते. या मध्ययुगीन व उत्तर-मध्ययुगीन संस्कृतीचा कोणतेही चष्मे न चढवता शोध घेणे हे या संस्कृतीचा प्रवास समजण्यास मदत करणारे आहे.

नंतरच्या मुघल बादशहांमध्ये मुहम्मदशाह (1719-46) हा संगीताच्या विकासासाठी प्रसिद्ध आहे. त्याच्या काळात धृपद गायकी अधिक विकसित झाली. तो मुहम्मदशाह `रंगीले' म्हणून प्रसिद्ध झाला व अनेक बंदिशी – चीजा त्याच्या काळात बांधल्या गेल्या. तबला-सतार ही वाद्ये मुहम्मदशाह रंगीलेच्या काळात खुसरो खानने (अमीर खुसरो नव्हे) प्रथम तयार केली. त्यापूर्वी या वाद्यांचा उल्लेख आढळत नाही. सदारंग व अदारंग हे ख्यालीये होते. तेथूनच ग्वाल्हेर घराण्याची गायकी सुरू झाली असे मानतात.

## मोगलांनंतर

मोगलसत्ता उताराला लागल्यावर लखनौ, बनारस, गुजरात इत्यादी ठिकाणी

कलावंत गेले किंवा तेथील सुलतान-राजांनी त्यांना आश्रय दिला. अवधचा नवाब वाजिद् अली शाह, रीवाचा राजा विश्वनाथसिंह, काशीचा राजा उदितनारायण, चरखारीचा राजा रतनसिंह, रामपूरचा नवाब महमद्अलीखान हे सवर्च गुणग्राही शासक होते. वाजिद् अली शाह कवी व गायक होता. लय-तालावर त्याची हुकूमत असल्याचे अनेक किस्से आहेत. शायरी-गाण्यापायी राज्य गमावल्याचेही त्याला दुःख झाले नाही. तो स्वतः उत्तम गायक होता. पखवाजवादक कुदोसिंह, जोतसिंह त्याच्या दरबारी होते. रोहिलखंडच्या (रामपूर) नवाबांकडे तर कित्येक गायक-वादक-नर्तक आश्रयास होते. नवाब हामीद् अलीखान (1889-1930) हा धृपद, पखवाज, तबला, नृत्य यांत निष्णात होता व मुश्ताक हुसेन खान, अच्छनमहाराज, पं. भातखंडे, बीनकार वजीरखान, पखवाजवादक गयाप्रसाद, अयोध्याप्रसाद त्याच्या दरबारी होते. त्याच वंशातील छम्मनसाहेब यांनी पं. भातखंड्यांशी चर्चा केली. फलसफ-ऐ-मौसिकी (संगीताचे तत्त्वज्ञान) हा ग्रंथ त्यांनी लिहिला. विसाव्या शतकात रामपूर दरबारने बाबा अल्लाउद्दीन खां व हाफिज अली खां (अमजद् अली खां यांचे वडील) यांसारख्या विलक्षण प्रतिभावंतांची देणगी दिली.

या काळापर्यंत ख्यालगायकी शास्त्रीय संगीताचा गाभ्याचा भाग बनली. ठुमरी, दादरा, चैती, कजरी, टप्पा, होरी यांसारख्या संगीतप्रकारांची निर्मिती झाली. सूफींच्या प्रारंभाच्या काळापासून कव्वाली लोकप्रिय झाली. या प्रत्येक प्रकारातली सांगीतिक मूल्यांची व अलंकारांची परस्पर देवघेव, संगीत अलंकारांची निर्मिती होत होती. हा सांगीतिक इतिहासही तेवढाच उपयोगी आहे.

धृपदगायन हा इथल्या संगीतातील अत्यंत परिष्कृत आविष्कार आहे. आलाप, जोड, आभोग, संचारी अशा स्वरांच्या उत्कट व विभिन्न आविष्कारा/शोधानंतर गत येते. इथे पखवाज (मृदंग)च्या साथीवर कविता (धृपद) असते. त्यात लय-तालाच्या सूक्ष्म-बृहत् अशा गुंतागुंतीच्या, नाजुक व बुद्धिमान प्रक्रिया असतात. धृपद परंपरेत डागर, खंडाहार, नोहार, गोहर अशा चार वाणी (घराणी) प्रसिद्ध आहेत. यांपैकी सर्वांत लोकप्रिय म्हणजे हरिदास स्वामींच्या परंपरेतील डागरवाणी. स्वामी हरिदास डागर हे 1505 पासून वृंदावनला विरक्तवृत्तीने विद्यादानात रममाण होते. डागरवाणीचे वैशिष्ट्य म्हणजे

त्यात स्वरांच्या अत्यंत तरल पोतांचा व बिंदूंचा शोध असतो. पुढे डागरांचे वंशज जयपूरच्या नवाबाकडे होते व त्याच्या सेवेत होते. आख्यायिका अशी की त्या वेळी डागरांनी मुस्लिम नवाबाच्या हातचे खाल्ले म्हणून ब्राह्मणांनी त्यांना बहिष्कृत केले. त्यानंतर डागर घराणे `मुस्लिम' झाले.

मात्र या डागरांची परंपरा ही स्वरसाधनेला परब्रह्माची व परमेश्वराची उपासना मानणारी आहे. धृपदातील नोम-तोम ही ओंकारयुक्त आराधना असते. सरस्वती, गणेश, शंकराची प्रतिष्ठा असते. मोहर्रममध्ये डागरांचे गाणे बंद असते. सामगायनापासून ते धृपदापर्यंतचा प्रवास डागरांनी (सध्याच्या पिढीपर्यंत तरी) जपून ठेवला आहे. स्व. झिया मोहियुद्दीन डागर हे भरतनाट्यशास्त्रातल्या किंवा संगीतातल्या सिद्धान्ताबद्दल चर्चा करीत. रहीम फईमुद्दीन डागर (दिल्ली) हे संगीताच्या विविधता, उदारतेबद्दल व त्याच्या विलक्षण स्वरूपाबद्दल भरभरून बोलताना या लेखकाने अनुभवले आहे. इराणमधल्या सूफी कवी रूमच्या मजनूच्या कैफियतीपासून तुलसीदासाच्या दोह्यापर्यंत संगीत कसे एकच आहे हे ते आपल्या मुलायम आवाजात दाखवत. अथर्वशीर्षातल्या उदात्त, अनुदात्त स्वरित सुरांपासून त्याचे सांगीतिक रूपांतर करत ते थेट रागसंगीतापर्यंतचा प्रवास सहज दाखवून जात. `सूर इतनी हसीन चीज है कि तू उसे छूना चाहता है, लेकिन वह तो देखने से मैली हो जाती है।' असा संगीतातल्या सुराबद्दल डागर बांधवांचा दृष्टिकोण राहत आला.

डागरांच्या घरात भारतीय संस्कृतीचा असा विलक्षण आविष्कार पाहायला मिळतो. गेल्या पिढीतले एक डागर, निजामुद्दीन डागर आपल्या दुसऱ्या नावाने – मकरंद पांडे या नावाने देखील ओळखले जात. धृपदगायकीतील इतर परंपरादेखील लुप्त पावत असल्याचे दिसत असताना डागरांची नवी पिढी आता धृपद सादर करीत आहे. मात्र पिढीला तेवढीच तपश्चर्या, मेहनत व सखोलता आहे की नाही याबद्दल शंका आहे.

ख्यालगायकीची परंपरा तर विलक्षण आहे. ख्यालातील घराणी, उस्ताद-गुरू व शिष्य यांचा इतिहास आपल्या एकसाची व घट्ट कल्पनांना छेद देतो. मात्र त्याची संगीताची व जीवनाच्या मूल्यांची संस्कृती मात्र कोणत्याही धर्माच्या शुद्ध स्वरूपासारखीच आहे.

**महाराष्ट्रातील स्वरपरंपरा**

महाराष्ट्रात उत्तर हिंदुस्तानी घरंदाज संगीताची सुरुवात बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे यांच्याच जोडीने नंतर पं.विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्यासारख्यांनी केली. भास्करबुवांचे पहिले गुरु फैझ महंमदखाँ होते. ग्वाल्हेरात भास्करबुवांनी या गुरूची मनोभावे सेवा केली व गुरूनेही त्याला पुत्रवत वागवले. हद्दूखां-हस्सूखां यांच्यापासून चाललेली स्वच्छ व स्पष्ट गायकीची परंपरा आहे. यात भूगंधर्व रहिमतखां हे एक विलक्षण प्रकरण होते. गोविंदराव टेंब्यांनी तर त्या आवाजाचे वर्णन करताना म्हटले, ``त्या आवाजाचे, गायनाच्या सहजसौंदर्याचे, सहज-बाळबोध परंतु भारदस्तपणाचे, निर्मळ रसभरित तयार तानेचे – कशाकशाचे म्हणून वर्णन करायचे. खालपासून वरपर्यंत कृत्रिमतेचा लवलेश नाही. अत्यंत बाळसेदार, गुटगुटीत, गोंडस लहान मूल कसेही पडले, बसले, बागडले तरी त्याचे निर्व्याज मनोहारित्व कसलेल्या नर्तकीला व नटाला येऊ शकत नाही, त्याप्रमाणे खाँसाहेबांच्या गाण्याचे मनोहारित्व होते.'' कोल्हापुरातील त्यांच्या एका बैठकीतील तानेचे वर्णन गोविंदराव करतात, ``मधात बुडवून काढलेली बिनबियांच्या द्राक्षाची लडीच जणू. त्यात बीचा वा सालीचा पापुद्रादेखील नाही. लुसलुशीत व रसाने ओथंबलेली.''

हे रहिमतखाँ हद्दूखां या ग्वाल्हेर गायकीच्या प्रमुख गायकांचे चिरंजीव. जात्याच गोड गळा. मात्र नंतर भ्रमिष्ट झाले. बनारसला मिठाईवाल्याच्या दुकानी बसून चार-दोन चीजा गाऊन चार-आठ आणे घ्यायचे व अफूची तल्लफ भागवायची. त्या काळात महाराष्ट्रातले सर्कसवाले विष्णुपंत छत्रे बनारसला गेले. ते संगीताचे जाणकार होते. रहितखाँना व्यसनाधीन अवस्थेत भटकताना त्यांनी आपल्याकडे आणले. चुचकारून, गोंजारून शेवटपर्यंत त्यांना ताब्यात ठेवले. भावासारखे वागवले. अफूचे व्यसन मर्यादित केले., त्यांना दररोज नियिमत गायनास बसवले. अशा अतुलनीय गायकाला माणसात आणून त्याची गायनकला प्रकाशात आणली. जिथे सर्कस जाई तिथे त्यांचे गाणे ठेवत; अशा रीतीने ते कोल्हापूरला आले. कोल्हापूरला विष्णुपंत व नंतर काशीनाथपंथ छत्रे व अखेरपर्यंत कुरुंदवाडकर संस्थानिकांच्या छत्राखाली हा गंधर्वलोकाऐवजी

भूलोकात आलेला माणूस राहिला.

कोल्हापूरच्या शाहूमहाराजांच्या गुणग्राही व रसिक छत्राखाली अनेक गायकवादकांना आश्रय मिळाला; त्यांची संख्या खूप आहे. कोल्हापुरात गाण्या-बजावण्याचे प्रस्थही होते. देवल क्लब हे त्याचे दृश्य स्वरूप. मात्र संगीतातील गौरीशंकर म्हणून ज्यांचा टेंब्यांनी व अन्य तज्ज्ञांनी गौरव केला ते अंत्रौली – जयपुर घराण्याचे अल्लादिया खांसाहेब व त्यांचे दोन्ही पुत्र मंजीखां, भूर्जीखां. यांची गायकी या 1910 ते 1935-40 पर्यंत बहरली. अल्लादियाखांसाहेबांच्या गायकीचे वर्णन गोविंदराव व नंतर वामनराव देशपांड्यांनी केले आहे. त्यांच्या मते स्वर व लयीचा सुरेख व सूक्ष्म मेळ असलेले, भारदस्त, भरदार, सततप्रवाही व शुद्ध, सात्त्विक गाणे. असे गायन हे आपल्या घरंदाज गायकीतील शिखर ठरावे. अर्थात इतर घराण्यांच्या अभिमानींचा त्याला विरोध आहेच.

मात्र शाहू छत्रपतींनी या गायनमहर्षीला महाराष्ट्रातच थांबवले. ते त्यांना अत्यंत प्रेमळपणे व आदरभावाने वागवत. अल्लादियाखां यांचे तीनशे वर्षांपूर्वीचे पूर्वज मूळचे शांडिल्य गोत्रज ब्राह्मण. दिल्लीपती बादशहाच्या कारकिर्दीत त्यांचे जबरीने धर्मांतर झाले. मात्र खांसाहेबांची राहणी, वागणे-बोलणे हे सोवळ्या ब्राह्मणाला लाजवेल इतके निर्मळ होते. ``गंभीर व भारदस्त प्रतिष्ठितपणा, ओतप्रोत विद्या असून वल्गना नाही. इतरांच्या कर्तबगारीला प्रोत्साहन देण्याची वृत्ती, निंदा, व्यसन नाही.'' ही त्यांची वैशिष्ट्ये गोविंदराव सांगतात.

``भैय्या अल्लादियाखां, तुम्हारा जहाँ गला जाता है, वहाँ हमारी नजर भी नहीं जा सकती.'' ही समकालीन गवय्यांची प्रशस्ती जरी मिळाली, तरी मत्सर, असूया यांमुळे मुंबईच्या नझीरखाँ वगैरे वतनदार मंडळींना प्रकरण डोईजड वाटत होते. पुढे ते पुण्याला गेल्यावर बापूसाहेब कागलकरांनी त्यांचे गाणे ऐकून त्यांना शाहूमहाराजांकडे आणले. कोल्हापुरात अल्लादियाखांसाहेबांना अनेक शिष्य मिळाले. धोंडूताई कुलकर्णी, मुंबईला  मोगुबाई कुर्डीकर आणि केसरबाई केरकर, नारायणराव बालगंधर्व ही काही नावे. मंजीखां व भूर्जीखां यांच्या अनेक शिष्यांपैकी मल्लिकार्जुन मन्सूर यांना कोण विसरेल!

कोल्हापूर, मिरज, धारवाड, कुंदगोळ, हुबळी हा परिसर त्या काळात जणू गाणारा मुलूख झाला होता. भारतातील अनेक गायकी परंपरा, महान गायक या

पट्ट्यात येऊन राहिले किंवा निर्माण झाले. मुंबई हे आणखी एक प्रमुख केंद्र. बडोद्याला सयाजीराव गायकवाड हे अत्यंत गुणग्राही, पुरोगामी व रसिक वृत्तीचे शासक होते. बडोदा संस्थान व आपली प्रजा सुसंस्कृत, सुंदर व्हावी म्हणून या माणसाने कितीतरी दूरदर्शी उपक्रम राबवले. त्यांत `कलाभुवन' ही संस्था होती. त्यात अनेक कलाकार होते. श्रीमंतांनी अनेकांना आश्रय दिला. किराणा घराण्याचे प्रवर्तक अब्दुल करीमखां व त्यांचे भाऊ वहीद खां तरुणपणी बडोदा दरबारात होते. अत्यंत सुसंस्कृत, अदबशीर व तयारीचे गवई म्हणून त्यांची ख्याती पसरत होती. महाराजांना गाण्याची जाणकारी होती. तयांच्या महाराणीसाहेब चिमणाबाई व राजमाता जमनाबाई यांनाही त्यांचे गाणे आवडायचे, म्हणून त्यांना देवासमोर गायला बोलावले. अब्दुल करीम खांसाहेबांची भजने इतकी उत्कट असत की त्यामुळे भजनांचा बाजही अधिक शास्त्रीय झाला. `अब की टेक हमारी – लाज राखो गिरधारी' या भजनापासून `घालिन लोटांगण – वंदीन चरण', `तुम मेरी लाज राखो हरी। तुम जानत सब अंतयार्मी', `तूही जग जननी, तू ही दुःखहरिणी – तूही ज्वालामुखी, तूही माता सरस्वती' अशा काव्यांना-भजनांना खांसाहेबांनी लोकप्रिय बनविले.

करीमखांसाहेब शास्त्राचे विद्वान होते. संगीताचे जग हे एक स्वतंत्र विश्व आहे, त्यात त्याचे नेम-धर्म असतात, त्याची परंपरा असते हे सहजपणे त्यांच्या बोलण्यात येई. 1890 च्या शेवटच्या वर्षांमध्ये आपली भूमिका सांगताना ते म्हणतात, ``हिंदू और मुसलमान धर्म में मंत्र में भी सूर व लय है। हमारे `ला इलाह इल्लिला' व आपका `ओम नमः शिवाय' यह मंत्र में भी सूर व लय है। सूर के बिना ईश्वर-अल्ला खूष होता ही नहीं। हमारे गायन-वादन की कला वेदों से चली आ रही है.. मेरे बुजुर्गों ने ईश्वर माना है... हमारे कुलपुरुष नायक धोंडू व नायक मन्नू थे। दोनों भी ग्वालियर के राजा के पास थे। दोनों ही मथुरा जाकर श्रीकृष्ण के द्वारपर भक्तिगीत गाते थे। इन जाति-धर्म के झगडे में हम पडते नहीं... गाने के बारे में आप कहे तो धमार, धृपद, होरी, टप्पा, ठुमरी सब आपको सुना सकते हैं। कहे तो काठियावाड का गरबा सुनायेंगे।''

बडोद्याच्या सरदार माने यांच्या उपपत्नी हिराबाईंना संगीत शिकवताना त्यांची मुलगी ताराबाई यादेखील करीमखांच्या शिष्या झाल्या. पुढे गायकबंधू

प्लेगमुळे बडोद्यातून मिरज-कोल्हापूर, औंधकडे आल्यावर त्याही त्यांच्याबरोबर आल्या. पुढे त्यांनी रीतसर त्यांच्याशी निकाह लावला – ताराच्या ताहेराबी झाल्या – 1902 नंतर या जोडप्याला झालेली अपत्ये संगीताचे समर्थ वाहक ठरली. अब्दुल रहमान (ऊर्फ सुरेशबाबू माने), चंपाकली ऊर्फ हिराबाई बडोदेकर, गुलाब (कमलबाई), सकीना ऊर्फ सरस्वतीबाई राणे यांनी भारतीय संगीताचा वारसा अधिक समृद्ध केला. खांसाहेबांचे संपूर्ण चरित्र याच संगीताच्या व भक्तीच्या आयामात होते. म्हणून इतर धर्म, जात हे आयाम फारच गौण होते. त्यांच्या गायकीने हिंदुस्थानी संगीतात सुरांच्या उत्कटतेचे नवे विश्व तयार केले. रामभाऊ कुंदगोळकर (सवाई गंधर्व) व त्यानंतर भीमसेन जोशी, गंगुबाई हनगळ, बसवराज राजगुरु व अन्य अनेक वारसांनी किराणा गायकीचा वारसा कायम राखला. `गोपाला मेरी करुणा क्यूं नहीं आवे' हे फजन अनेकांच्या डोळ्यांत पाणी आणते. त्याचबरोबर विष्णु नारायण भातखंड्यांबरोबर संगीतातील श्रुती `दाखवण्याचे' जाहीर कार्यक्रमही ते करीत होते. मिरजेच्या खाजा शमन्नापीरांच्या दर्ग्यात त्यांची नियमित हजेरी असे. योगी अरविंदांवरही त्यांची श्रद्धा होती.

या संगीताच्या धर्माच्या परीक्षेची एकदा वेळ आली व त्याला खांसाहेबांनी कसे उत्तर दिले ते फार उद्बोधक आहे. पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी 1908 मध्ये गांधर्व महाविद्यालय लाहौरला सुरू केले होते. गाण्यापेक्षा जास्त गाण्याच्या संघटनावर त्यांचा भर होता. मुस्लिम गवयांनी गायनाचा बाज बदलून तो बाजारू केला असा त्यांचा आरोप होता. सोलापूरला गांधर्व महाविद्यालयाच्या प्रचारार्थ त्यांचा जलसा होता. ते गाताना खूप भाषण देत. सोलापूरच्या भाषणात ते म्हणाले, ``आपली प्राचीन विद्या या मुसलमान गवयांनी बाटवली आहे. ती यांच्या मगरिमठीतून सोडवण्यासाठी मी प्रयत्न करत आहे.'' इत्यादी.

या भाषणावर खांसाहेबांच्या बरोबरीचे गायक-वादक चिडले. अब्दुल हक, राजण्णा वगैरे विरोधासाठी उठले. खांसाहेब शांतपणे आपल्या लोकांना म्हणाले, ``नहीं ऐसा नहीं करना चाहिए। नहीं तो वे कहते है वैसे ही सब लोग समझेंगे। उनको प्रत्यक्ष क्रिया से ही जवाब देंगे।'' मग आपल्या चाहत्यांशी विचारविनिमय करून खांसाहेबांनी बेळगांवात 10 मे 1910 मध्ये `आर्य संगीत विद्यालया'ची स्थापना केली. या वेळी बेळगावमधील गंगाधरराव देशपांडेंसहित अनेक

चाहत्यांनी गर्दी केली. आपली दोन मुले – अब्दुल रहमान व चंपाकली (सुरेशबाबु-हिराबाई) यांच्या मुलांनी शारदास्तवन केले. विष्णु दिगंबरांच्या आरोपाची दखल घेऊन यावेळी करीम खांसाहेब यांनी गायकांतील व्यसनीपणा, दुर्गुणावर टीका केली. ते म्हणाले, ``गवईलोक प्रायः व्यसनी, आळशी, अशिक्षित व तबियतखोर आणि शिकवण्यास नालायक ठरल्याने सुशिक्षित वर्गाचे तिकडे दुर्लक्ष होत आहे. या कलेचा सशास्त्र अभ्यास व व्यावहारिक शिक्षण नसेल व सुशिक्षितांची अभिरुची नसेल तर या ऋषिप्रणीत गायनकलेचा अस्त होईल.''

आग्रेवाले फैयाजखां हे प्रेमपिया नावाने बंदिशी बांधत. पतियाळा पद्धतीचे ज्येष्ठ गायक बडे गुलामअलीखां यांनी `वंदे नंदकुमारम्', `हरिः ओम तत्सत्'सारख्या रचना लोकप्रिय केल्या. असंख्य हिंदू गायकगायिकांना मुस्लिमांचे शागीर्द होण्यास कमीपणा वाटत नसे. अमान अली भेंडीबाजारवाले यांच्याकडून वसंतराव देशपांडे. जितेंद्र अभिषेकींनी अनेक अलंकार, तानांचे प्रकार घेतले. नझीरखां भेंडीबाजारवाल्यांकडे अंजनीबाई मालपेकर शिकल्या. अंजनीबाईंना सर्व कलावंत मानत. बालगंधर्व, कुमार गंधर्वांपासून गुलामअली व अमानअली त्यांचा आदर करीत व त्यांच्याकडून काही घेत.

याच परंपरेत रामपूरचे मैंहर घराण्याचे बाबा अल्लाउद्दीन खान हे विलक्षण प्रतिभावंत व्यक्तित्व होते. बाबांवर काही पुस्तके व काही माहितीपटही निघाले. त्यांची म्हैसूरच्या देवीवर श्रद्धा होती. संगीत व अध्यात्माचा संबध लावणाऱ्या अल्लाउद्दीन खान यांच्याकडे अन्नपूर्णा, मोरमा व सरस्वती. पैकी अन्नपूर्णादेवींनी रविशंकरांशी विवाह केला. नंतर ते वेगळे झाले. आज अली अकबर खां यांचे अमिरकेत कॅलिफोर्निया येथे संगीतविद्यालय आहे. त्यात सरस्वती, गणपती, लक्ष्मी, ब्रह्मा यांच्या तसिबरी आहेत. खांसाहेब तर संगीताची उत्पत्ती ब्रह्मा व सरस्वतीपासून मानतात.

हे सर्व विश्लेषण, वर्णन तंतोतंत बरोबर आहे की नाही हा मुद्दा वेगळा आहे. या सर्वच उदाहरणांचे तात्पर्य आहे की माणसाच्या दैनंदिन किंवा निर्मितिक्षम आयुष्यात तुमचा धर्म, जात किंवा इतर उपाधी निरर्थक ठरतात. त्या नसाव्यातच असे नाही. सर्वच संगीतकारांची व गायकांची आपल्या धर्मावर, गुरूवर अपंरपार श्रद्धा आहे. ही श्रद्धाच त्यांना अधिक जाणते, डोळस बनवते. आपला ईश्वर हाच

दुसऱ्याचा ईश्वर आहे व दुसऱ्यांचा तो आपलाही असतो, हा आध्यात्मिक भाव या निर्मितिक्षमतेत राहत आला आहे. संगीत ही त्या परमतत्त्वाची उपासना आहे हे सर्वच जाणतात. म्हणून मुस्लिम गवई कृष्ण-गोपींच्या होरी-ठुमऱ्या गातात, बड़े गुलाम अली खां `ओम् तत्सत्' गातात; जसराज `मेरो अल्ला मेहरबां'चा अहिरेभैरव गातात. `अब मेरी नैया पार करो' – हजरत निजामुद्दीन औलिया ही तोडीतील बंदिश किंवा `पार करो अरज सुनो – हिंद के पीर ख्वाजा मोईनुद्दीन' मध्ये पूरिया धनश्रीचे सूर वाहत जातात.

याहून मोठी बाब म्हणजे कोणतीही लोकांची – देशाची संस्कृती एका काळामध्ये – गटामध्ये सीमित राहत नसते. कोणतीही एक संस्कृती त्याच्या विचारांबाबतीत व व्यवहारांबाबत सतत देवाण-घेवाण करत असते. `मुस्लिम धर्म अरब-इराणचा राहत नाही; भारतीय मुस्लिम वेगळे होतात – इथल्या भूगोल – वस्तुस्थितीमुळे व हिंदूंसह इतर समाजांच्या संपर्क-प्रभावातून विचार व्यवहारात बदल होतात. तोच प्रकार हिंदूंचा आहे. एका विशिष्ट गटाचा एका विशिष्ट काळातला आचार-विचार म्हणजे हिंदुत्व वा भारतीयत्व आहे असे मानणे अनैतिहासिक व अवास्तव आहे. अशी सांझी संस्कृती ही समकालीन व वास्तव संस्कृती असते. स्वतःची मूल्ये कायम ठेवून नव्या, `इतर' गोष्टी सामावून घेऊन संस्कृती वाढत, समृद्ध होत जाते. हेच भारतातला सुरांचा प्रवास सांगतो.

संदर्भ :- माझा संगीत व्यासंग – गोविंदराव टेंबे, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1984. – मुसलमानी आमदानीतील भारतीय संगीत – आचार्य कैलासचंद्र देव `बृहस्पती', अनुवाद – मा.कृ.पारधी, म.रा.सा.सं.मं., मुंबई 1985. – घरंदाज गायकी – वामनराव देशपांडे, मौज प्रकाशन, मुंबई, 1985. – अब्दुल करीम खां यांचे जीवनचरित्र – बाळकृष्ण कपिलेश्वरी, सरस्वती संगीत विद्यालय, मुंबई, 1972

***(साभार : उद्गार, पॉप्युलर प्रकाशन)***

* * *

# मिल्ग्रम प्रयोग – विघातक आज्ञाधारकपणा

*धनंजय मुळी*

मिल्ग्रम प्रयोग, आज्ञाधारकता

-----------------------------------------------------------------------

आपण सर्वजण विघातक आज्ञाधारकतेचे बळी ठरण्याची  शक्यता आहे. व आपल्याला त्याबद्दल खूपच कमी जाण आहे हे भान जागविणारा सामाजिक मानसशास्त्रातील एका महत्त्वाच्या पैलूची ओळख करून देणारा लेख

-----------------------------------------------------------------------

*जाहीर सूचना*

*एका तासासाठी ४ डॉलर कमावण्याची संधी - स्मरणशक्तीच्या अभ्यासासाठी लोक हवे आहेत.*

* *आम्हाला स्मरणशक्ती आणि शिक्षणासंदर्भातील वैज्ञानिक अभ्यासासाठी न्यु हॅवन येथील पाचशे पुरुषांची मदत हवी आहे. हा अभ्यास येल विद्यापीठात करण्यात येणार आहे.*
* *सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस साधारण एका तासासाठी ४ डॉलर (अधिक कारभत्त्यापोटी ५० सेंटस) दिले जातील. आम्हाला तुमचा फक्त एक तास हवा आहे – अजून काहीही नको. तुम्ही येण्यासाठीची वेळ – संध्याकाळी, सोम-शुक्र किंवा शनि-रवि – तुमच्या सोयीने निवडू शकता.*
* *शिक्षण, प्रशिक्षण किंवा अनुभवाची कुठलीही अट नाही. आम्हाला कारखान्यातील मजूर, शहरी नोकरदार, मजूर, न्हावी, व्यापारी, व्यावसायिक, कारकून, बांधकाम-मजूर, टेलिफोन लाईनवरील मजूर, विक्रेते, पांढरपेशे कर्मचारी किंवा इतरही चालतील.*
* *सहभागी व्यक्तीचे वय २० ते ५० च्या मध्ये असावे. शाळेतील किंवा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार नाही.*

* *जर आपण या अटींची पूर्तता करू शकत असाल तर आम्हाला खालील कूपन भरून प्रा. स्टॅन्ले मिल्ग्रम, मानसशास्त्र-विभाग, येल विद्यापीठ, न्यु हॅवन या पत्त्यावर पाठवा. तुम्हाला अभ्यासाच्या नेमका दिवस आणि वेळेबद्दल नंतर कळवण्यात येईल. कुठलाही अर्ज नाकारण्याचा हक्क आम्ही राखून ठेवत आहोत.*
* *तुम्हाला ४ डॉलर (अधिक ५० सेंटस) प्रयोगशाळेत आल्याआल्या दिले जातील.*

* *कूपनचे तपशील*

१९७४ साली वरील जाहिरात एका वर्तमानपत्रात प्रकाशित झाली. ज्या व्यक्ती या अभ्यासात सहभागी झाल्या त्यांना विशिष्ट वेळी येल विद्यापीठातील मानसशास्त्र विभागात बोलवण्यात आले. तिथे त्यांची अजून एका व्यक्तीसोबत गाठ पडली. प्रयोगकाने (प्रयोग करणारा, experimenter) समोर येऊन त्या दोन व्यक्तींना प्रयोगाबद्दल थोडक्यात माहिती दिली.

*"स्मरणशक्ती आणि शिक्षा या संदर्भात आम्ही अभ्यास करतो आहोत. शिक्षा दिल्याने स्मरणशक्ती वाढून शिकणे सुधारेल का याबद्दल आमचा प्रयोग आहे. तुमच्यापैकी एकजण शिक्षकाच्या भूमिकेत असेल तर दुसरा विद्यार्थी बनेल. प्रयोग अधिक प्रभावी व्हावा यासाठी शिक्षक एका खोलीत आणि विद्यार्थी दुसऱ्या खोलीत अशी व्यवस्था केलेली आहे. तुम्हा दोघांचे संभाषण मायक्रोफोन-स्पीकर आणि या दिव्यांद्वारे होईल. मी शिक्षकाला शब्दांच्या जोड्या असलेली एक यादी देईन जी त्याने विद्यार्थ्याला एकदा पूर्ण वाचून दाखवावी. नंतर त्यातील किती शब्द लक्षात राहिले हे तपासण्यासाठी आपण चाचणी घेऊ. या चाचणीमध्ये शिक्षक विद्यार्थ्याला शब्दांच्या जोडीतील पहिला शब्द वाचून दाखवेल आणि उत्तरासाठी पर्याय म्हणून अ, ब, क, ड असे चार पर्यायी शब्द वाचून दाखवेल. विद्यार्थ्याने त्यातील योग्य पर्यायासमोरील बटन दाबून आपले उत्तर सांगायचे आहे. हे उत्तर चुकल्यास शिक्षक विद्यार्थ्याला शिक्षा म्हणून या शॉक जनरेटर यंत्रावरील एक बटन दाबून तेवढ्या व्होल्टसचा शॉक देईल. पहिल्या चुकीस १५ व्होल्टसच्या शॉक देण्यात येईल. पुढील उत्तरे चुकत गेल्यास प्रत्येक चुकीच्या*

*उत्तरास १५ व्होल्टसच्या पटीत (१५-३०-४५...) शॉक देण्यात येईल. शॉक जनरेटर यंत्रावर १५ व्होल्टपासून ४५० व्होल्टची बटने आहेत."*

दोन व्यक्तींपैकी एकजण विचारतो की हे शॉक धोकादायक आहेत काय. त्यावर प्रयोगक सांगतो की या शॉकमुळे वेदना होतात परंतु ते धोकादायक नाहीत (painful but not dangerous).

प्रत्यक्ष प्रयोगास सुरुवात होण्याआधी शिक्षक कोण व विद्यार्थी कोण हे चिठ्ठ्या टाकून ठरते. व्होल्टसच्या शॉक मिळण्याच्या क्षमतेचा अंदाज यावा म्हणून शिक्षकाला ३० व्होल्टसच्या एक शॉक दिला जातो. शॉक देणाऱ्या पट्ट्या विद्यार्थ्याच्या हाताशी बांधल्या जातात, विद्यार्थी आणि शिक्षकाला वेगवेगळ्या कक्षांमध्ये बसवले जाते आणि प्रत्यक्ष प्रयोगास सुरुवात होते.

प्रयोगामध्ये शिक्षक एक शब्द वाचून दाखवतो आणि उत्तरादाखल चार पर्याय वाचून दाखवतो. विद्यार्थी ए, बी, सी, डी यांपैकी एक बटन दाबून दिव्याद्वारे आपले उत्तर कळवतो. सुरुवातील बहुतेक उत्तरे बरोबर येतात. नंतर मात्र उत्तरे चुकू लागतात. शिक्षक पहिल्या चुकीच्या उत्तरास १५ व्होल्टसचा शॉक देतो. पुढील चुकीच्या वेळी (३० व्होल्टसनंतर) ४५ व्होल्टसच्या शॉकच्या वेळी विद्यार्थी पहिल्यांदा 'आऊच' असा आवाज करतो. असा आवाज आल्यावर शिक्षक प्रयोगकाकडे पाहतो. प्रयोगक अत्यंत शांतपणे "कृपया पुढे चालू ठेवा" असे म्हणतो. त्यापुढील प्रत्येक शॉक्सच्या वेळी (चुकीच्या उत्तराची शिक्षा म्हणून) वेदनादर्शक आवाज येत जातो. प्रयोगकाला विचारल्यास तो आधीच्याच प्रकारे शांततेने "कृपया चालू ठेवा", "प्रयोगात तुम्ही पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे", "तुम्ही प्रयोग चालू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे", "तुम्हाला पुढे चालू ठेवावेच लागेल, दुसरा कुठलाही पर्याय तुमच्याकडे नाही" अशी उत्तरे (याच क्रमाने) देतो. ११५ व्होल्टसचा शॉक दिल्यानंतर मात्र विद्यार्थी जोरात ओरडतो आणि म्हणतो "मला मोकळे करा, मला पुढे नाही जायचे".

**यक्षप्रश्न**

वरीलप्रमाणे ओरडणे ऐकू आल्यावरही प्रयोगक आधीच्याच शांतपणे "कृपया पुढे चालू ठेवा" असे म्हणतो. अशा वेळी शिक्षक काय करेल? शिक्षक

प्रयोगकाचे ऐकेल की विद्यार्थ्यांचे ऐकून शॉक देणे थांबवेल? तुम्हाला काय वाटते? समजा हा प्रयोग १०० 'शिक्षकां'वरती केला गेला तर त्यापैकी किती व्यक्ती ४५० व्होल्टसपर्यंत शॉक देतील? (तुमचे उत्तर एका कागदावर नोंदवून ठेवा.) नंतरच्या प्रत्येक शॉकच्या वेळी विद्यार्थी वेदनादर्शक ओरडतो आहे, कधीकधी मोकळे करण्याबद्दल विनवणी करतो आहे असे दिसत असताना पण प्रयोगक शांत असताना किती व्यक्ती पुढे जातील?

स्टॅन्ले मिल्ग्रम यांच्या प्रयोगाचा हेतू खरेतर हेच तपासण्याचा होता. स्मरणशक्ती संबंधातील चाचणी हे आवरण होते. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यापैकी विद्यार्थी कोण असणार हे आधीच ठरलेले होते. शिक्षकाचे वर्तन तपासण्यासाठी हा प्रयोग होता. अधिकारी व्यक्तीने आज्ञा/सूचना दिल्यास कुठल्या मर्यादेपर्यंत तिचे पालन केले जाते? या प्रयोगात विद्यार्थी थांबवण्यासाठी विनवणी करत असताना किती शिक्षक विजेचे धक्के देत प्रयोग पुढे चालू ठेवतील हे तपासणे हा प्रयोगाचा हेतू होता.

## सामाजिक मानसशास्त्राबद्दल थोडेसे

सामाजिक मानसशास्त्र (Social psychology) ही मानसशास्त्राची एक उपशाखा आहे. इतर लोकांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उपस्थितीमुळे लोकांच्या विचारांवर, भावनांवर आणि वागण्यावर होणारा परिणाम या उपशाखेत अभ्यासला जातो. ही ज्ञानशाखा विज्ञाननिष्ठ आहे, म्हणजेच प्रयोगांचा आणि प्रयोगपद्धतींचा वापर, माहितीचे विश्लेषण करून निष्कर्षाप्रत येणे आणि निष्कर्ष peer-reviewed शोधनिबंधांमध्ये प्रकाशित होणे या विज्ञानशाखेच्या मूलभूत वैशिष्ट्यांचा सामाजिक मानसशास्त्रात समावेश होतो.

लोक विशिष्ट सामाजिक सेटिंग्जमध्ये कसे वागतात आणि त्यांच्या त्या वागण्यामागची कारणे काय असू शकतील यावर सामाजिक मानसशास्त्राने खूप महत्त्वाचे योगदान दिले आहे. सामाजिक मानसशास्त्रातील अभ्यासांमुळे सामाजिक घटनांवरती केवळ भावनिक किंवा उथळ चर्चा न होता त्या घटनांवरती गंभीर आणि विज्ञाननिष्ठ चर्चा घडू शकते. सामाजिक

मानसशास्त्रातील आज्ञाधारकपणा ह्या विषयाची आणि त्यासंबंधातील सर्वांत महत्त्वाच्या मिल्ग्रम प्रयोगाची या लेखाद्वारे चर्चा केली आहे.

## मिल्ग्रम प्रयोगाचे निष्कर्ष

मिल्ग्रम यांना त्यांच्या अभ्यासात असे आढळून आले की सहभागी लोकांपैकी ५०% लोकांनी अगदी शेवटपर्यंत – म्हणजे ४५० व्होल्टपर्यंत धक्के देणे चालू ठेवले. जाहिरातीत उल्लेखल्याप्रमाणे सहभागी लोक हे वेगवेगळ्या शैक्षणिक आणि व्यावसायिक पार्श्वभूमीचे होते.

सहभागी लोकांना प्रयोग-उत्तर मुलाखतीत *"विद्यार्थ्यांच्या विनवण्या आणि ओरडणे ऐकू येत असतानाही तुम्ही शॉक देणे पुढे चालू का ठेवले?"* या प्रश्नाचे बहुतेकांचे उत्तर पुढील धाटणीचे होते. *"मला अर्थातच थांबायचे होते पण तुम्ही मला प्रयोग चालू ठेवण्याबद्दल सूचना देत होता", "परिणामांची जबाबदारी तुमची होती असे तुम्ही सांगितले होते".* ज्यांनी शॉक देणे थांबवले नाही अशा ५०% लोकांना आपण कसे बघू? दुसऱ्या व्यक्तींना पीडा देण्यात आनंद देणारी व्यक्ती (saddist) असे त्यांचे सरसगट वर्गीकरण करता येईल काय? सामाजिक मानसशास्त्रातील एक समकालीन प्राध्यापक स्कॉट प्लाऊस असे म्हणतात की या लोकांना सॅडिस्ट मानण्यासारखी दुसरी घोडचूक नाही.

मुद्दाम उल्लेख करून सांगण्याजोगी गोष्ट अशी की पूर्ण प्रयोगादरम्यान सर्व सहभागी प्रयोगार्थी शिक्षक शॉक देताना आणि आतून ओरडणे ऐकताना मानसिक तणावाखाली होते. प्रत्येक वेळी ओरडणे ऐकू आले की ते प्रयोगकर्त्याकडे बघत आणि त्याला विचारत की आपण थांबायला हवे का. प्रयोगकर्त्याने "पुढे चालू ठेवा" म्हटल्यानंतर ते पुढे चालू ठेवत. पण शॉक देणे आणि समोरच्या व्यक्तीचे ओरडणे ऐकून त्यांचा तणाव वाढतच होता. प्रा. स्कॉट प्लाऊस याला अपरिणामकारक आणि अनिर्णायक अ-आज्ञाधारकपणा असे म्हणतात. प्रयोगार्थी आज्ञा पाळण्यासाठी विरोध करत परंतु त्यांचा विरोध फलदायी होत नसे.

मिल्ग्रम प्रयोगात थोडे बदल करून ते प्रयोगही करण्यात आले आहेत. त्यातील मुख्य निष्कर्ष हा की जसजसे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील प्रत्यक्ष

अंतर (physical proximity) कमी होते तसा आज्ञाधारकपणाही कमी होताना दिसतो.

## प्रयोगाची पार्श्वभूमी आणि निष्कर्षांचे सार्वत्रिकीकरण

स्टॅन्ले मिल्ग्रम स्वत: दुसऱ्या महायुद्धात जर्मनीतून अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या ज्यू आई-वडिलांचे अपत्य होते. न्युरेम्बर्ग इथे चालू असलेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या युद्ध गुन्हेगारांच्या खटल्यात ज्यू-वंशहत्येसंदर्भातील अडॉल्फ इकमन (Adolf Eichmann) या प्रमुख गुन्हेगाराकडून *"आपण फक्त आज्ञांचे पालन करत होतो"* असा बचाव केला गेला. त्यावरून मिल्ग्रम यांना *"हे शक्य आहे का की इकमन आणि त्याच्यासारखे लोक हे केवळ आज्ञांचे पालन करत होते?"* हा प्रश्न पडला आणि मिल्ग्रम प्रयोगासाठीचा तो एक महत्त्वाचा प्रेरक हेतू ठरला.

या प्रयोगाद्वारे मिल्ग्रम यांनी असे दाखवून दिले की वरिष्ठांप्रती किंवा अधिकारपदावरील व्यक्तींप्रती आज्ञाधारकपणा (obedience to authorities) आपण समजतो तेवढी क्षुलक्क गोष्ट नाही. मिल्ग्रम यांचा प्रयोग २-३ वेळा वेगवेगळ्या कालखंडात करण्यात आलेला आहे आणि त्याचे निष्कर्ष बदललेले दिसत नाहीत. मिल्ग्रम यांचा प्रयोग म्हणजेच ज्यू-वंशहत्याकांड असा अपरिपक्व दावा सामाजिक मानसशास्त्रातील कुणीही करू इच्छित नाही. पण केवळ जर्मन समाज किंवा दुसऱ्या महायुद्धकालीन परिस्थितीच वंशहत्येला कारणीभूत होती असे मानणे म्हणजे आपल्या स्वत:च्या बळी पडण्याच्या जागांकडे (vulnerability) जाणीवपूर्वक डोळेझाक करणे होय. वंशहत्येसारख्या अतिरेकी घटनेला अनेक सामाजिक ताणेबाणे असतात. अशा घटना पुन्हा घडू नयेत या उद्देशाने त्याबद्दल वैज्ञानिक पद्धतींच्या आधारे जाणून घेणे, त्यामध्ये काही मानसशास्त्रीय सारखेपणा असतो का हे शोधून काढणे मिल्ग्रम प्रयोगासारख्या प्रयोगांचे उद्दिष्ट असते.

सामाजिक मानसशास्त्रातील आज्ञाधारकपणाच्या कुठल्याही प्रयोगात एक गोष्ट ठळकपणे दिसते. ती म्हणजे आज्ञाधारकपणाची जाण असण्याचा अभाव. मिल्ग्रम प्रयोगातही लोकांना किती लोक कमाल मर्यादेचा शॉक देण्यापर्यंत पुढे

जातील असे विचारले असता त्यांनी दिलेल्या उत्तराची सरासरी १०% एवढी आहे. म्हणजे साधारण सर्वजणांना सहभागी लोकांपैकी केवळ १०% लोक कमाल मर्यादेचा शॉक देतील असे वाटते. वर चर्चा केल्याप्रमाणे प्रत्यक्षात हा आकडा ५०% एवढा मोठा आहे. असेच उत्तर इतर प्रयोगांबाबतीतही मिळाले आहे. विस्तारभयास्तव आणि मुख्य गाभा मिल्ग्रम प्रयोगात येऊन गेल्यामुळे आज्ञाधारकपणावरील इतर प्रयोगांची चर्चा या लेखात टाळली आहे. प्रा. स्कॉट प्लाऊस म्हणतात – *"म्हणजे आपण दुहेरी अडचणीत आहोत. पहिली अडचण ही की आपण सर्वजण विघातक आज्ञाधारकतेचे बळी ठरण्याची (vulnerable to distructive obedience) शक्यता आहे. दुसरी अडचण अशी की आपल्याला त्याबद्दल खूपच कमी जाण (lack of awareness) आहे."* यामुळे आपली आपल्या बळी पडू शकणाऱ्या गोष्टींबद्दलची जाण वाढवणे महत्त्वाचे आहे.

मिल्ग्रम प्रयोगातील निष्कर्षांवर आणि त्यांच्या सार्वत्रिकीकरणावर (कुठल्याही वैज्ञानिक सिद्धांताबद्दल घेतले जातात तसे) आक्षेप घेण्यात आले आहेत. परंतु प्रस्तुत लेखकाला ते आक्षेप वाचल्यानंतर त्यांची दखल घ्यावी एवढे महत्त्वाचे वाटलेले नाहीत.

**प्रयोगपद्धतीमधील नैतिकता**

मिल्ग्रम प्रयोगातील सहभागी लोकांना प्रयोगाचा पूर्ण काळ मानसिक तणावातून जावे लागले. एवढ्या लोकांना मानसिक तणाव देऊन निष्कर्ष काढणे महत्त्वाचे आणि समर्थनीय आहे का असे वैध आक्षेप घेण्यात आले आहेत. प्रस्तुत लेखकाचा या नैतिकतेबद्दल विचार चालूच आहे पण काही बाबी नोंदाव्याशा वाटतात. मिल्ग्रम यांनी ज्यावेळी हा प्रयोग केला त्यावेळी अशा प्रयोगाच्या नैतिक बाजूंबद्दलचे नियम बनलेले नव्हते. तसेच प्रत्येक प्रयोग झाल्यानंतर प्रयोगार्थी व्यक्तीला शॉक दिल्याबद्दल अपराधी वाटू नये यासाठी त्यांची विद्यार्थी व्यक्तीशी भेट घालून देण्यात आली आणि त्यांना अपराधगंड निर्माण होऊ नये यासाठी पूरक उपाय करण्यात आले.

आजच्या काळात असे प्रयोग कुणाला करायचे असल्यास त्यांना त्या त्या शैक्षणिक संस्थेशी संबंधित समितीकडून (Ethics review committee) नैतिक पूर्व-अटींची पूर्तता करायला लागते. यामध्ये प्रयोगार्थीकडून संमतिपत्र भरून घेणे, प्रयोगार्थीला प्रयोगातून कुठल्याही क्षणी बाहेर पडण्याची मुभा असणे तसेच प्रयोगार्थींना त्यांना मानसिक ताण येतील अश्या काही गोष्टी कराव्या लागतील याची कल्पना देणे बंधनकारक असते. मानसिक ताणाचा कालावधी कमीत कमी असेल अशा पद्धतीने प्रयोग करावे लागतात.

## समारोप

या विषयाबद्दल जाणून घेणे दृक्-श्राव्य माध्यमाद्वारे सोपे जाते. लिखाणातून चित्र उभे करणे हे अवघड काम वाटले तरीही या आणि यासारख्या प्रयोगांबद्दल मराठीत लिहिले जावे असे वाटल्यामुळे प्रस्तुत लेख लिहिला आहे. मिल्ग्रम प्रयोगाची आणि आज्ञाधारकपणा या सामाजिक मानसशास्त्रातील विषयाची तोंडओळख करून देणे हा लेखाचा हेतू आहे. जिज्ञासूंनी खालील संदर्भ शोधल्यास त्यांना अधिक माहिती मिळू शकेल.

## संदर्भ आणि आभार


१. Introduction to social psychology या विषयावरील प्रा. स्कॉट प्लाउस यांचा www.coursera.org या संकेतस्थळावरील कोर्स - https://www.coursera.org/course/socialpsychology
या कोर्समधेच Social Psychology - D G Myers, McGraw-Hill पुस्तकातील काही प्रकरणे वाचावयास मिळतील आणि काही उत्तम videos ही मिळतील.

२. Stanley Milgram आणि Milgram experiment विकीपेडिया

३. www.simplypsychology.org/milgram.html



४. आभार : सोबत कोर्स करणाऱ्या आणि चर्चेत भाग घेणाऱ्या मित्रांचे



**ईमेल**: dhananjaymuli@gmail.com

# गांधी, मार्क्स, आंबेडकर : परस्परपूरकता शोधू या

*सुरेश सावंत*

गांधी, मार्क्स, आंबेडकर, परस्परपूरकता

---

मार्क्स, गांधी, आंबेडकर तसेच अन्य महामानव यांच्या वैचारिक समन्वयाचा आग्रह न धरता त्यांच्यातील परस्परपूरकत्व शोधणे व त्या पायावर व्यापक एकजुटीचा कार्यक्रम आखून आपल्या संविधानातील प्रगत मूल्यांना आव्हान देणाऱ्या शक्तींना पराभूत करणे कसे आवश्यक आहे ह्याची अभिनिवेशहीन मांडणी

---

गांधी-आंबेडकर-मार्क्स हे त्रांगडे अजून काही सुटत नाही. उलट ते अधिकच तीव्र होते आहे की काय, असे वाटावे, असे पुरोगामी चळवळीतले सध्याचे वातावरण आहे. रोहित-कन्हैया प्रकरणाने तर आंबेडकर-मार्क्स वादाला नवी फोडणी बसली. या सगळ्या चळवळीकडे सजगपणे पाहणारा व त्यात सक्रिय सहभाग घेणारा एक कार्यकर्ता म्हणून या वादाकडे पाहताना मला काही केल्या कळत नाही की, आजच्या टप्प्यावर या वादाचे प्रयोजन काय? हे वाद ऐतिहासिक आहेत. ते तीव्र आहेत. त्यांचा निरास होण्याची सुतराम शक्यता नाही. मग तरीही या तिघांना एकत्र गुंफण्याचे कारण काय? हो. कारण आहे. या तिघांच्या उद्दिष्टांत सामायिक असणाऱ्या काही महत्त्वाच्या उद्दिष्टांना जोरदार धडका देणारी त्सुनामी सध्या उसळली आहे. जे सामाईक आहे, त्याच्या रक्षणासाठी या तिघांच्या वारसदारांनी एकजुटीत येणे ही काळाची गरज आहे. यात प्रत्येकाने आपल्या वैचारिक भूमिका पातळ करण्याचा, सोडण्याचा प्रश्न येत नाही. तसेच जे सामायिक आहे, त्यासाठी या तिघांच्या तत्त्वज्ञानाचा, वैचारिक भूमिकांचा समन्वय करत बसण्याचीही गरज नाही. गरज आहे ती केवळ परस्परपूरकता शोधण्याची. हा शोध मात्र प्रामाणिक व पारदर्शी असायला हवा. त्यात कोण कोणाला आपल्याकडे खेचते आहे, फशी पाडून आपल्या गोटात आणते आहे,

असे वाटता कामा नये. खरं म्हणजे, आपल्याला खेचले जाते आहे, फशी पाडले जाते आहे, ही भावना आंबेडकरी कार्यकर्त्यांमध्येच प्रकर्षाने आहे. आणि ती निराधार नाही.

बाबासाहेबांचे भारताच्या राजकीय क्षितिजावर आगमन झाले, त्यावेळी गांधीजींचा सूर्य मध्याह्नी तळपत होता. बाबासाहेबांनी या सूर्याला आह्वान देणे, हे प्रचंड धाडसाचे व पराकोटीचे दडपण आणणारे होते. ते त्यांनी केले. वर्णाश्रमधर्माचे पाठीराखे महात्मा गांधी अस्पृश्यता नष्ट करून हिंदुधर्म स्वच्छ करू पाहत होते. स्वातंत्र्य चळवळीतील आपल्या अन्य सहकाऱ्यांची प्राधान्यक्रमाविषयी नाराजी असतानाही अस्पृश्यताविरोधी जागरण हे राजकीय लढ्याचे अभिन्न अंग त्यांनी केले होते. त्यासाठी त्यांनी अपार कष्टही घेतले. बाबासाहेबांनी हिंदू धर्मावरच आघात चढवले. हिंदुधर्मातील जातिव्यवस्था नष्ट झाल्याशिवाय अस्पृश्यांना मुक्ती नाही, अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच, सार्वजनिक तळी, मंदिरे खुली करण्याच्या सत्याग्रहांनंतर जोवर हिंदुधर्म आहे, तोवर जाती असणार, जाती असणार तोवर अस्पृश्यता असणार या निष्कर्षाला ते आले. हिंदुधर्म त्यागणे हाच त्यांना उपाय वाटला. त्यांनी आपल्या लाखो अनुयायांसहित बौद्ध धम्म स्वीकारला.

गांधी-आंबेडकरांतील या वादाचा त्यांच्या काळात त्यांनी निरास केला नाही, तो त्यांच्या मृत्यूनंतर कसा करायचा? हे त्यांच्यातील वैचारिक मतभेद होते. ते आजही कबूल करावेच लागतील. त्यांच्या वारसदारांतही ते राहतील. ते तसेच व तेवढेच तीव्र राहतील असे नाही. गांधींची वर्णाश्रमधर्माची व जातिव्यवस्थेबाबतची मते आजच्या गांधीवाद्यांना मान्य आहेत, असे नव्हे. पण गांधीजींना अभिप्रेत उन्नत मूल्यांवर आधारलेला सनातन हिंदुधर्म हा कट्टर हिंदुत्वाची घोडदौड रोखण्यासाठी पर्याय आहे, असे त्यांना वाटू शकते. या दोन्ही बाबी आंबेडकरी कार्यकर्त्यांना अमान्य असू शकतात.

### पुणे करार : एक अपरिहार्यता

काही ऐतिहासिक बाबींचे मात्र आज मापन करून कोण बरोबर कोण चूक हे ठरवता येणे कठीण असते. त्यातील एक पुणे करार. तेव्हा मी असतो तर

कोणाच्या बाजूने उभा राहिलो असतो? अर्थात बाबासाहेबांच्या बाजूने. याचे कारण मी दलित आहे. आपल्या अवनत अवस्थेला राजकीय अधिकारांच्या साहाय्याने नष्ट करण्याची'आता नाही तर कधीच नाही' अशा कोटीतली ती संधी होती. ही संधी घेणे म्हणजे ब्रिटिशांचे पाठीराखे होणे नाही. आम्हालाही देश स्वतंत्र होणे हवे आहे. पण देशाला स्वतंत्र करण्यासाठी आम्ही पारतंत्र्यात राहणे आम्हाला मंजूर नाही.

पण मी सवर्ण व स्वातंत्र्य-चळवळीतील एक कार्यकर्ता असतो तर? नक्कीच गांधीजींच्या बाजूने असतो. आधीच मुस्लिम लीगने मुस्लिमांना अलग करून स्वातंत्र्य-चळवळीत खिंडार पाडलेले असताना अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाद्वारे हे दुसरे खिंडार पाडणे म्हणजे स्वातंत्र्याचा लढा कमजोर करणे होय, ही माझी भूमिका असती. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव जागा देऊनही दलितांचे उत्थान साधता येईल. आणि देश स्वतंत्र झाल्यावर तर आपण हे सगळे करूच. आज आपली जूट टिकविणे कळीचे आहे. दलित म्हणून माझा जो अनुभव पारतंत्र्यातील इंग्रजांच्या कायद्याच्या राज्यात भोवतालच्या सवर्णांबाबत होता, तो पाहता याच सवर्णांच्या हातांत सगळी सत्ता आल्यावर आमचे काय होईल, ही बाबासाहेबांच्या बाजूने उभे राहणाऱ्या माझी भीती होती.

अशा वातावरणात बाबासाहेब व गांधीजी या दोहोंच्या अनुयायांना परस्परांच्या नेत्यांविषयी चीड येणे हे अगदी स्वाभाविक आहे, हे मात्र काळाच्या या टप्प्यावर समजून घेणे शक्य आहे. गांधीजींसारख्या देशाचे आराध्य असलेल्या नेत्याचे उपोषणाद्वारे प्राण गेल्यास होणारा देशभरच्या दलितांवरील परिणाम लक्षात घेऊन बाबासाहेबांनी माघार घेणे, स्वतंत्र मतदारसंघांऐवजी राखीव जागा कबूल करणे यापेक्षा प्राप्त स्थितीत उत्तम निर्णय कोणता असू शकला असता, हे मला कळत नाही.

या निर्णयाविषयी बाबासाहेब म्हणतात- 'हिंदूंना करार आवडला नाही आणि अस्पृश्यांना तो अनुकूल नव्हता. असे असतानाही दोन्ही पक्षांनी पुणे कराराला मान्यता दिली.'

ही दोन्ही बाजूंची माघार व सन्मान्य तडजोड असली तरी दलितांना हा पराभव वाटणे व त्यातही दलित म्हणून या पराभवाची वेदना अधिक जाणवणे हे

स्वाभाविक आहे. काहींना हा पराभव आजही बोचत राहणे हेही मला समजू शकते. पण वर्तमानाच्या आजच्या टप्प्यावर त्यातच अडकून पडणे व गांधीजींना शिव्या देणे हे गैरवाजवी आहे. या शिव्या देण्यात हा करार करणाऱ्या बाबासाहेबांचाही आपण उपमर्द करतो, हे या मंडळींच्या लक्षात येत नाही. या बाबी ऐतिहासिक संदर्भात पाहणे नाकारल्याने मित्रशक्ती गमावून आपणच आपली ताकद खर्ची करत असतो.

## स्वातंत्र्यानंतर बदललेल्या भूमिका

गांधीजींशी बाबासाहेबांचे मतभेद काय होते, ते किती तीव्र होते, हे आपण पाहिले. पण देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे स्वातंत्र्य काँग्रेसला मिळालेले नसून देशाला मिळाले आहे आणि म्हणून पहिल्या मंत्रिमंडळात देशातील विविध राजकीय प्रवाहांचे प्रतिनिधित्व असायला हवे ही भूमिका घेण्यात गांधीजींचा पुढाकार होता. बाबासाहेबांचा या मंत्रिमंडळात समावेश करण्याची सूचना गांधीजींची होती, असे काही इतिहासकारांनी नोंदवले आहे. घटना-समितीत बाबासाहेब निवडून आले तो मतदारसंघ पाकिस्तानात गेल्यावर दुसऱ्यांदा ते निवडून आले ते मुंबई इलाख्यातून. यासाठीचे सहकार्य काँग्रेसने दिले होते. मसुदा समितीच्या अध्यक्षपदी बाबासाहेब निवडले गेले. यामागेही गांधीजी होते, असेही हे इतिहासकार म्हणतात. लखलखीत गुणवत्तेमुळेच बाबासाहेबांना हा बहुमान मिळाला, हे उघडच आहे. तथापि, राष्ट्रीय हिताचा विचार करताना मतभेद आड येऊ देता कामा नये, या गांधीजींच्या भूमिकेचा यथोचित आदरही करायला हवा.

ज्या मूल्यांवर आधारित संविधान तयार करण्यासाठी बाबासाहेब हवे असे गांधीजींना वाटत होते, ती मूल्ये या दोघांची समान होती. संविधानाच्या प्रास्ताविकात नमूद झालेली ती हीच दोहोंची सामायिक मूल्ये. जर त्या काळात तीव्र मतभेद असतानाही या सामायिक मूल्यांसाठी ते एकमेकांना सहकार्य करत होते, एकत्र काम करत होते, तर आज ही मूल्ये धोक्यात आलेली असताना त्यांच्या वारसदारांनी परस्परांत तसेच सहकार्य का करू नये? बाबासाहेबांनी जर त्यावेळी गांधीजी किंवा नेहरू यांच्या सगळ्या भूमिका पटल्या तरच मी घटना

लिहीन अशी अट ठेवली नाही किंवा गांधी-नेहरूंनी बाबासाहेबांकडून ठेवली नाही, तर आपण तरी ती आज का ठेवावी? ते जसे परस्परपूरक राहिले, तसेच आपणही राहू शकतो.

काठमांडूचे बाबासाहेबांचे भाषण 'बुद्ध आणि मार्क्स' यात बाबासाहेबांनी मार्क्स व बुद्धाचे लक्ष्य एक असले तरी मार्ग वेगळे आहेत, मार्क्सचा मार्ग हिंसेचा आहे, बुद्धाचा अहिंसेचा आहे, म्हणून तो अधिक योग्य आहे, अशी मांडणी केली आहे. मूळ मार्क्सने काय म्हटले यापेक्षाही मार्क्सवादी क्रांत्यांतील रक्तरंजित व्यवहार बाबासाहेबांना आक्षेपार्ह वाटतो. देशातील कम्युनिस्टांनी जातीच्या लढ्याला दुय्यम लेखणे, जातिव्यवस्था ही फक्त श्रमाची नव्हे, तर श्रमिकांची विभागणी आहे हे लक्षात न घेणे यावर बाबासाहेबांचा आक्षेप आहे. ५२ च्या निवडणुकीतील 'मते कुजवा' या डांगेंच्या आवाहनाने बाबासाहेबांच्या पराभवाला जो हातभार लागला, त्याने कम्युनिस्ट व बाबासाहेब यांच्यातली दरी अधिकच रुंदावली.

बाबासाहेब संसदीय लोकशाहीचे भोक्ते, तर कम्युनिस्टांनी आपद्धर्म म्हणून तीस मान्यता देणे (काही कम्युनिस्ट गटांना तर हा आपद्धर्मही मान्य नाही.) हा मोठा तात्त्विक मतभेद दोहोंत होता. आजही तो आहे. पण कम्युनिस्टांकडून आंबेडकरी जनतेशी संबंध जोडताना त्याबाबत स्पष्ट व पारदर्शक मांडणी होताना दिसत नाही. मतभेद स्पष्ट नोंदवून स्वतंत्र मजूर पक्षकाळातील बाबासाहेबांचे सर्व कष्टकऱ्यांना एकवटणाऱ्या आंदोलनाच्या स्मृती जागवून त्यावर एकत्र येणे म्हणजेच दोघांतले सामायिकत्व शोधणे होय. हे होत नसल्याने सतत संशयाचे भुंगे आंबेडकरी कार्यकर्त्यांचे मन कुरतडत राहतात.

बरे, यात काहीजण चलाखीने बाबासाहेब व गांधीजींच्या मतभेदाचा वापर करतात. गांधीजींची अहिंसा बाबासाहेबांना मान्य नव्हती, असे म्हणत वर्गशत्रूचा निःपात करताना हिंसा आवश्यकच असते, याला जणू बाबासाहेबांची संमतीच आहे, असे भासवतात. आपल्या प्रचारसाहित्यात बाबासाहेबांची एका हातात घटना व दुसऱ्या हाताचे बोट उंचावलेली प्रचलित प्रतिमा किंचित बिघडवतात. उंचावलेल्या बोटाच्या जागी वळलेली मूठ दाखवतात. यातून सनदशीर लोकशाहीऐवजी व्यवस्था उलथवणाऱ्या विद्रोहाचा संदेश बाबासाहेबच देत

आहेत, असा आभास तयार होतो. यांच्या कलापथकाचा वेश निळा असतो, पण गाणी मात्र जहाल क्रांतीची असतात. कष्टकऱ्यांच्या, पीडितांच्या न्यायासाठी त्यागपूर्वक लढणाऱ्या या जहाल कम्युनिस्टांकडे आंबेडकरी समूहातील कोवळी तरुण मुले आकर्षित होत असतात. बाबासाहेबांच्या मूळ साहित्याचा परिचय नसल्याने व एकूण आंबेडकरी चळवळ विशीर्ण-विदीर्ण झालेली असल्याने या जहाल मंडळींबाबत समाजासाठी काही करू इच्छिणाऱ्या आंबेडकरी युवकांना आपलेपणा वाटणे स्वाभाविक आहे. या मुलांतील काहींचा प्रवास मग अधिक जहाल कारवायांकडे होतो. काही क्रमात जाणते होऊन तो मार्ग पकडतात. काहींना फसगत झाल्याचे उशीरा कळते. काही परततात. काहींचा परिस्थितीनेच परतीचा मार्ग बंद होतो. भल्या उद्दिष्टासाठी का होईना पण माणसाच्या माणूसपणाला कमी लेखून त्याला साधन म्हणून वापरण्याची ही रीत मला क्रूर व अनैतिक वाटते.

**'भीम पुतळ्यात बंद केला बाई!'**

मार्क्स, गांधी, आंबेडकर ही माणसे होती. त्यांच्या मांडणीला कमीअधिक काळाच्या मर्यादा पडू शकतात. त्यांच्या मांडणीतील जे आता गैरलागू असेल ते सोडणे, उपयुक्त असेल ते टिकवणे व काहींचा विकास करणे यातूनच वर्तमान आह्वाने पेलण्याचा विचार व कार्यक्रम मिळू शकतो. ही ऐतिहासिक दृष्टी व संदर्भ हरवले की महामानवांना देवत्व व पावित्र्य येणे सुरू होते. त्यांच्या मांडणीवर कोणी टीका केली की त्यांचे अनुयायी (एव्हाना ते भक्त झालेले असतात) खवळून उठतात. गांधी या बाबत सुदैवी आहेत. त्यांच्यावर कोणीही कशीही टीका करू शकतो. त्यांचे विडंबन करू शकतो. मार्क्सही टीकेला-चिकित्सेला पात्र होतो, त्यामुळे तोही तसा भाग्यवान आहे. बाबासाहेब मात्र अत्यंत दुर्दैवी आहेत. विचारवंताला त्याच्या आयुष्यातच चांगला टीकाकार मिळणे, हे भाग्याचे असते, असे मानणाऱ्या बाबासाहेबांना हे भाग्य त्यांच्या समाजाने मिळू दिलेले नाही. पर्यायाने, त्यांच्या मांडणीचा विकास होऊ दिलेला नाही. संभाजी भगतांच्या गाण्याचा आधार घेऊन म्हणायचे तर 'भीम पुतळ्यात बंद केला बाई!'

रोहित वेमुलाच्या आत्महत्येनंतरची आंदोलने व कन्हैयाच्या संदर्भातली आंदोलने यांत निळा-लाल सहकार्याची मांडणी होऊ लागल्यावर आंबेडकरी समुदायातील एका शिक्षित विभागात अस्वस्थता पसरू लागली. (उदित राज व आठवले हे आंबेडकरी बाण्याचे नेते भाजपला मिळाले व खासदार झाले यामुळे येणारी अस्वस्थता ही या तुलनेत अगदीच मामुली.) काहींना हे नेहमीप्रमाणे 'बामणी कारस्थान' वाटले. त्यासाठी कन्हैयाच्या जातीचा खरा-खोटा शोध घेतला गेला. काहींना संघपरिवाराचा धोका लक्षात घेता कन्हैयाने दिलेले आह्वान आश्वासक वाटले. पण त्याच्या घोषणेतील 'जयभीम-लाल सलाम' ही संयुक्तता त्यांना रुचली नाही. कम्युनिझम हा निकामी (काहींच्या मते धोकेदायक) आहे, तो सोडून कन्हैया आंबेडकरवादाकडे येत असेल तरच आम्ही त्याचे स्वागत करू. इथे आंबेडकरवाद हीच जगाला तारणारी एकमेव विचारसरणी आहे, तिच्याकडेच सगळ्यांनी आले पाहिजे, अन्य पुरोगामी विचारधारांशी तिची जूट बांधणे हा बाबासाहेबांच्या विचारांशी द्रोह आहे, हे गृहीत आहे. खरे म्हणजे, आपले तेच श्रेष्ठ मानणारी ही भूमिका हाच आंबेडकरवादाशी द्रोह आहे.

ही अहंता व हा कर्मठपणा यापासून आजादी, मार्क्स, गांधी, आंबेडकर तसेच अन्य महामानव यांच्या वैचारिक समन्वयाचा आग्रह न धरता त्यांच्यातील परस्परपूरकत्व शोधणे व त्या पायावर व्यापक एकजुटीचा कार्यक्रम आखणे आणि आपल्या संविधानातील प्रगत मूल्यांना आह्वान देणाऱ्या शक्तींना पराभूत करणे हा संकल्प बाबासाहेबांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने आपण करायला हवा. कन्हैया कशाकशापासून आजादी हवी आहे, त्याच्या घोषणा देतो आहे. ही आजादी प्रत्यक्षात आणण्यासाठीच्या वाटेवर असा हा संकल्प एक सशक्त पाऊल नक्की ठरेल.

**ईमेल:** sawant.suresh@gmail.com

**साभार : *आंदोलन शाश्वत विकासासाठी*, एप्रिल २०१६**

# दुष्काळ – चांगल्या कामांचाही

*चतरसिंह जाम*

दुष्काळ,   राजस्थान, पारंपरिक जलव्यवस्थापन

---

कमी पाऊस म्हणजे दुष्काळ हे समीकरण खोडून काढणारा, सामूहिकता, पारंपरिक शहाणपण  व बंधुभाव म्हणजे काय हे समजावून सांगणारा स्वानुभव.

---

आज टेलिव्हिजन कुठे नाही? आमच्याकडेही आहे. आमच्याकडे म्हणजे जैसलमेरपासून सुमारे शंभर किमी पश्चिमेला पाकिस्तानच्या सीमेवर. आता हेही सांगून टाकतो की आमच्याकडे देशातील सर्वात कमी पाऊस पडतो. कधीकधी तर पडतच नाही. तशी लोकसंख्या कमी आहे म्हणा, पण तेवढ्या लोकांनाही जरूरीपुरते पाणी तर लागतेच. त्यातूनही येथे शेती कमी व पशुपालन अधिक आहे. येथील लाखो बकऱ्या, गाई, उंटांसाठीही पाणी पाहिजे.

तर, ह्या टेलिव्हिजनमधून आम्ही गेल्या कोणजाणे किती काळापासून, देशातील काही राज्यांत पसरलेल्या दुष्काळाच्या भयानक बातम्या पाहत आहोत. गेल्या काही दिवसांत तर ह्याच्याबरोबर क्रिकेटचाही नवा वाद् जुळला आहे. त्यावर लवकरच कोणी विवेकी  न्यायाधीश त्यावर योग्य निवाडाही देतील.

तुमच्याकडे किती पाऊस पडतो, ते तुम्हालाच माहीत. आमच्याकडे गेल्या दोन वर्षांत पडलेल्या पावसाची माहिती तुम्हाला द्यायची आहे आम्हाला. जुलै २०१४ मध्ये ४ मिमी व ऑगस्टमध्ये ७ मिमी म्हणजे एकूण ११ मिमी पाऊस पडला होता. तेव्हाही आमचे हे रामगढ गाव दुष्काळग्रस्त म्हणून बातम्यांमध्ये आले नाही. आम्ही बातमीत झळकण्याची वेळच येऊ दिली नाही. त्यानंतर मागच्या वर्षी २३ जुलैला ३५ मिमी, ११ ऑगस्टला ७ मिमी व २१ सप्टेंबरला ६ मिमी पाऊस पडला. इतका कमी पाऊस पडूनही आम्ही आमचा पाचशे वर्षे जुना

विप्रासर नावाच्या तलाव भरून टाकला. हा विशेष तलाव आहे. लाखो वर्षांपूर्वी निसर्गात झालेल्या प्रचंड घडामोडीमुळे ह्या तलावाखाली माती, खडे, जिप्सम ह्यांचा एक थर जमला होता. ह्या थरामुळे पावसाचे पाणी वाळवंटाच्या खालून वाहून जाऊन समुद्राच्या खाऱ्या पाण्याला मिळत नव्हते. ते रेतीत ओलाव्याच्या रूपात सुरक्षित राहत असे. ह्या ओलाव्यालाच आम्ही रेजवानी पाणी असे म्हणतो.

तलावात वरच्या भागात भरलेले पाणी काही महिनेपर्यंत गावाच्या उपयोगी पडते. ह्याला आम्ही पालर पाणी म्हणतो. त्याच्या वैज्ञानिक तपशिलांमध्ये आताच जायला नको, परंतु तलाव वरून सुकल्यानंतर रेतीतल्या ह्या ओलाव्याला आमचे पूर्वज कोण जाणे कधीपासून, बेरी, कुई नावाचा एक ढाचा बनवून त्याचा वापर करतात. आता एप्रिलच्या तिसऱ्या महिन्यातही आमच्या तलावात वर पाणी भरलेले आहे. ते सुकल्यावर रेजवानी पाणी ह्याच्या बेऱ्यामध्ये येईल आणि पुढील पावसाळ्यापर्यंत आम्ही पाण्याच्या बाबतीत अगदी स्वावलंबी राहू.

ह्या विशेष विप्रासरप्रमाणे आमच्या जैसलमेरमध्ये काही विशेष शेतेही आहेत. तसे पाहिले तर हा सारा दुष्काळी प्रदेशच आहे. पाऊस पडला, तर एखादे पीक हाती लागते. पण कुठे कुठे खडी किंवा जिप्समचा थर शेतांतही सापडतो. समाजाने शतकानुशतके ही शेते कुणा एका व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या हातात जाऊ दिलेली नाहीत. ह्या विशेष शेतांना समाजाने सगळ्यांचे बनवून ठेवले. ज्या ज्या गोष्टी तुम्ही कदाचित फक्त घोषणांमध्ये ऐकता, त्या सर्वांना जमिनीवर उतरवले आहे आमच्या समंजस पूर्वजांनी. ह्या विशेष शेतांमध्ये आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या काळातही सामूहिक शेती होते. दुष्काळातही उत्तम पीक घेतले जाते.

मागच्या वर्षात पडलेल्या एकूण पावसाचे आकडे तर आपण पाहिलेच आहेत. आता त्यांना पुढे मांडून ह्या विशाल देशाच्या कोणाही कृषितज्ज्ञाला विचारा, की एवढ्या पावसात गहू, मोहरी, तारामिरा, हरबरा ह्यासारखी पिके घेता येतात का, तर त्या सर्व तज्ज्ञांचे उत्तर ह्यावर नकारार्थी येते की नाही पाहा. तुम्ही आमच्या रामगढला आलात तर येथील खडीनांमध्ये ही सर्व पिके इतक्या कमी पाण्यात खूप चांगल्या रीतीने काढून सर्व सदस्यांच्या खळ्यांमध्ये ठेवलेली

तुम्हाला दिसतील. सांगायचे तात्पर्य असे की सगळ्यात कमी पाऊस पडणाऱ्या ह्या रूक्ष वाळवंटात आजही भरपूर पाणी आहे, धान्य आहे आणि पशूंसाठी भरपूर चारा आहे. इतकेच नव्हे तर काहीशा संकोचाने आम्ही हे सांगतो की इतक्या कमी पावसात आम्ही काढलेले पीक केवळ आमच्याच उपयोगी पडते असे नाही, तर पीक कापणीसाठी दूरदुरून लोक येतात. ह्यांच्यात बिहार, पंजाब, मध्यप्रदेशातील माळवा इत्यादी प्रांतामधल्या लोकांचा समावेश आहे. म्हणजे आमच्यापेक्षा खूप अधिक पाऊस पडणाऱ्या प्रदेशातील लोकांनाही येथे काम मिळाले आहे.

मराठवाडा, लातूर येथील बातम्या टीव्हीवर पाहूनही मन अत्यंत दुःखीकष्टी होते. जिल्हाधिकाऱ्यांनी जलस्रोतांवर कलम १४४ लागू केले आहे. पाण्यावरून माणसे भांडत आहेत. आमच्या गावांमध्ये मात्र इतका कमी पाऊस पडूनही गावकऱ्यांमध्ये परस्पर प्रेमाचे नाते अबाधित आहे. तुम्ही आलेल्या पाहुण्याला जेवताना आग्रह करणे ही गोष्ट तुम्हाला माहीत आहे. आमच्याकडेही पाहुण्याला अत्यंत प्रेमाने जेवण वाढले जाते. इतकेच नाही तर आमच्याकडील तलाव, विहिरी व कुई यांच्यावर पाणी उपसतानाही आज परस्परांना आग्रह केला जातो- प्रथम आपण पाणी घ्या, नंतर आम्ही घेतो. पाण्याने आमच्याकडील समाज बांधून ठेवला आहे. म्हणून, देशाच्या इतर भागांमध्ये जेव्हा आम्ही पाण्यावरून संबंध बिघडताना पाहतो, तेव्हा आम्हाला खूप वाईट वाटते.

ह्याच्यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे आपण अंथरूण पाहून पाय पसरत नाही. आता हेच पहा ना, मराठवाड्याला निसर्गाकडून पाणी थोडे कमी मिळाले, तर त्याने उसाची शेती करून आपले सर्व भूजल त्यालाच देऊन टाकले. आता किती संकटात पडलाय तो प्रदेश. विहिरीच्या तळाला लागलेले पाण्याचे चार थेंब आणि त्यावर लटकलेल्या शेकडो बादल्या हे दुर्दैवी चित्र तेथे दिसते.

कोणे एके काळी संपूर्ण देशात पाण्याबाबत एक समभाव होता. आज नवी शेती, नव्या तहानेची नवी पिके, कारखाने, तलाव बुजवून केलेली आणि वेगाने वाढणारी शहरे ह्या सर्वांमध्ये तो संयम केव्हाच संपला आहे. म्हणूनच तर आम्हाला एक तर चेन्नईसारखा भयानक पूर दिसतो, किंवा लातूरसारखा भीषण

दुष्काळ. चेन्नईच्या पुरात तिथला विमानतळ बुडून जातो, तर लातूरमध्ये रेल्वेने पाणी आणावे लागते.

कोठे किती पाऊस पडेल हे निसर्गाने हजारो वर्षांपूर्वीच निश्चित केले आहे. कोकणात, चेरापुंजीत खूप जास्त, तर जैसलमेरमध्ये अतिशय कमी. परंतु जेथे जेथे तो जसजसा आहे, तेथे तेथे निसर्गाचा स्वभाव ओळखून जर त्याने योजना केली असेल, त्याबाबतीत सरकारचे ऐकले नसेल, पैशाचा मोह आवरला असेल, तर तो समाज, तेथे पाणी कमी असो की अधिक, टिकून राहतो, मजेत राहतो. हे तगणे, मजेत राहणे आम्ही सोडले नाही. आमच्याकडील काही गावांमध्येही वातावरण बिघडले होते, परंतु गेल्या १०-१५ वर्षांत पुन्हा सुधारले आहे. ह्या सत्रात आमच्या समाजाने सुमारे २०० नव्या बेरया, १०० नव्या खडीन, पाताळी गोड्या पाण्याच्या ५ विहिरी, २०० ते १५० तलाई, नाडिया व टोपे आपल्या साधनांनी व आपल्या हिम्मतीने बांधले आहेत. त्यांपैकी कशावरही तुम्हाला सरकारी वा कोणत्याही स्वयंसेवी संस्थेचे नाव, बोर्ड वा पाटी लावलेली आढळणार नाही. हे सर्व आम्ही आमच्यासाठी बनवले आहेत, त्यामुळे ते सर्व पाण्याने काठोकाठ भरले आहेत.

वास्तविक आपल्या देशातील एकही असा प्रदेश नाही, जेथे जैसलमेरपेक्षा कमी पाऊस पडत असेल. म्हणूनच, तेथील दुष्काळी वृत्ती पाहून आम्हाला विलक्षण खेद होतो. आमचे दुःख तेव्हाच कमी होईल, जेव्हा आम्ही आमच्याबरोबरच इतर प्रदेशांतही असे विचार व अशी कामे पोहोचवू शकू.

...आमचे एक मित्र म्हणतात, की दुष्काळ एकटा कधीच येत नाही. त्यापूर्वी चांगल्या कामांचा, चांगल्या विचारांचा दुष्काळ पडतो.

**पत्ता :** पोस्ट रामगढ, जिल्हा जैसलमेर (राजस्थान)

**चलभाष :** 09672140359

# दस्तावेज

## गोहत्याबंदी आणि गांधीजी

गोहत्याबंदी, गांधीजी

---

गोहत्याबंदीच्या प्रश्नावर आपल्या देशात नुकतेच रण माजले होते. अजूनही हा वाद शमला नाही. ह्या पार्श्वभूमीवर भारतीय शेतीच्या भल्यासाठी गोसंगोपन आणि गोसेवेचा आग्रह धरणारे गांधीजी धार्मिक स्वातंत्र्याच्या आधारावर गोहत्याबंदीच्या मागणीला ठाम विरोध करतात हे समजून घेऊ या त्यांच्याच शब्दांतून.

---

राजेंद्रबाबूनी मला सांगितले की त्यांच्याकडे गोहत्याबंदीची मागणी करणारे सुमारे ५०,००० पोस्टकार्ड्स, २५,०००-३०,००० पत्रे व हजारो तारा येऊन पडल्या आहेत. मी तुमच्याशी ह्यापूर्वी ह्या विषयावर बोललो होतो. हा पत्र आणि तारांचा पूर कशासाठी? त्यांचा काहीही परिणाम झालेला नाही.

मला एक तार मिळाली ज्यात सांगितले आहे की एका मित्राने ह्या प्रश्नावर उपोषण सुरू केले आहे. भारतात गोहत्याबंदीसाठी कोणताही कायदा करता येणार नाही. हिंदूंमध्ये गोहत्या निषिद्ध मानली जाते ह्याबद्दल मला काही शंका नाही. मी फार पूर्वीच गोसेवेची प्रतिज्ञा केली आहे. परंतु माझा धर्म हा देशातील इतरांचा धर्म कसा बनू शकेल? त्याचा अर्थ हिंदू नसणाऱ्या भारतीयांवर जबरदस्ती करणे असा होईल.

धर्माच्या बाबतीत कोणावरही जुलूम-जबरदस्ती होणार नाही असे आम्ही कंठशोष करून सांगत आहोत. प्रार्थनेच्या वेळी आम्ही कुराणातील काही पंक्तींचे पठन करतो. पण कोणी जर माझ्यावर त्या म्हणण्याची जबरदस्ती केली, तर मला ते आवडणार नाही. एखाद्या व्यक्तीला जोवर तसे मनापासून वाटत नाही, तोपर्यंत मी कोणालाही गोहत्या न करण्यासाठी कसा बाध्य करू शकतो? भारतात फक्त हिंदूच तेव्हढे राहत नाहीत. इथे मुस्लीम, पारशी, ख्रिश्चन व इतर धर्म समुदाय देखील राहतात.

भारत हा आता हिंदूंचा प्रदेश झाला आहे असे हिंदूंनी मानणे चुकीचे आहे. इथे राहणाऱ्या सर्वांचा हा देश आहे. समजा आपण इथे गोहत्येवर बंदी आणली आणि त्याच्या नेमके उलट पाकिस्तानात घडले, तर काय होईल? समजा त्यांनी असे म्हटले की शरियतनुसार मूर्तीपूजेला बंदी आहे, म्हणून कोणत्याही हिंदूला मंदिरात जाता येणार नाही? मला तर दगडातही देव दिसतो, पण माझ्या ह्या श्रद्धेमुळे इतरांची काय हानी होते? म्हणून माझ्या मंदिरात जाण्यावर जर बंदी घालण्यात आली, तर मी ती पाळणार नाही. म्हणून मी असे सुचवितो की ह्या तारा आणि पत्रे आता बंद केली पाहिजेत. त्यांच्यावर पैसे नासणे योग्य नाही.

त्याशिवाय काही संपन्न हिंदू स्वतः गोवधाला उत्तेजन देतात. हे खरे आहे की ते आपल्या हातांनी गोहत्या करीत नाहीत. पण गायींना ऑस्ट्रेलियातल्या कत्तलखान्यात पाठवून त्यांच्या चामड्यापासून पादत्राणे बनवली जातात, ते लोक कोण असतात? माझ्या ओळखीचा एक सनातनी वैष्णव हिंदू आहे जो आपल्या मुलांना बीफ सूप देत असे. मी त्याला त्याबद्दल विचारले तेव्हा तो म्हणाला की गोमांस औषध म्हणून खायला काही हरकत नाही. आम्ही खरा धर्म काय आहें ह्याचा विचार करत नाही, फक्त गोहत्येला कायद्याने बंदी घातली पाहिजे म्हणून ओरडा तेव्हढा करतो. हिंदू लोक बैलांच्या खांद्यावर एव्हढे ओझे लादतात की त्यांचा जवळजवळ चुराडाच होतो. ही संथपणे केलेली गोहत्याच नव्हे काय? म्हणून मी असे सुचवीन की संविधान समितीत ह्या मुद्यावर फारसा आग्रह धरला जाऊ नये*...

मला असे विचारण्यात येते आहे की “मुसलमानांनी केलेले अत्याचार पाहता, कोणत्या मुसलमानांवर विश्वास ठेवावा हे ठरविणे कठीण होत आहे. (ह्या संदर्भात) भारतातील मुस्लिमांविषयी आपला काय दृष्टिकोन असावा? पाकिस्तानातल्या गैर-मुस्लिमांनी काय करावे?”

मी ह्या प्रश्नांचे उत्तर ह्यापूर्वीही दिले आहे. मी पुन्हा सांगतो की आज भारतातल्या सर्व धर्मांच्या कसोटीचा काळ आहे. येथील हिंदू, मुस्लीम , शीख व ख्रिश्चन ह्यांसारखे धार्मिक समुदाय कसे वागतात आणि भारताचा कारभार कसा चालवितात ह्याकडे आपल्याला लक्ष पुरवावे लागेल. पाकिस्तान केवळ मुसलमानांचा असेल, पण भारत सर्वांसाठी आहे. जर तुम्ही भेकडपणा सोडला

आणि शूर बनला तर तुम्हाला मुसलमानांसोबत कसे वागावे हा प्रश्न पडणार नाही. पण आजही आपल्यात भेकडपणा भरला आहे. त्यासाठीचा माझा दोष मी आधीच स्वीकारला आहे.

**माझी तीस वर्षांची शिकवण प्रभावहीन कशी ठरली ह्याचे मला अजूनही आश्चर्य वाटते. अहिंसा हे भेकडांचे शस्त्र बनू शकेल असे मी कसे गृहीत धरले? आताही जर आम्ही खरोखर शूर बनू शकलो आणि मुसलमानांवर प्रेम करू शकलो तर त्यांनाही थांबून विचार करावा लागेल की आपल्याशी दगाबाजी करून त्यांना काय मिळणार आहे? त्यांना आपल्या प्रेमाचे उत्तर प्रेमानेच द्यावे लागेल. आपण भारतातील कोट्यवधी मुस्लिमांना गुलाम बनवून ठेवू शकतो का? आपण जर तलवारीचा जवाब तलवारीने, काठीचा काठीने आणि लाथेचा लाथेने दिला तर पाकिस्तानात काही वेगळे घडण्याची अपेक्षा आपल्याला करता येणार नाही. मग आपले स्वातंत्र्य गमवायला आपल्याला काहीच वेळ लागणार नाही.**

**संदर्भ:** प्रार्थना प्रवचन – भाग १, पृ. २७७-२८० )

* गोहत्येच्या प्रश्नाची संविधान समितीत चर्चा झाली व त्यात सर्वानुमते असे ठरले की गोमांसभक्षणावर बंदी घालणारा राष्ट्रीय कायदा करू नये, तर राज्य धोरणाच्या (अबंधनीय) दिशादर्शक तत्त्वांत त्याचा समावेश करावा.


**<u>विचारवेध संमेलने पुन्हा सुरू होणार</u>**

१९९४ ते २००७ अशा १४ वर्षात महाराष्ट्रात १५ विचारवेध संमेलने झाली. बाबरी मशीद पडल्यानंतर निर्माण झालेल्या वातावरणाच्या संदर्भात ही संमेलने सुरू झाली.

सध्याच्या असहिष्णु, मनगटशाहीला, राडेबाजीला बढावा देणाऱ्या वातावरणात पुन्हा विचारवेध संमेलने सुरू होत आहेत. निर्भयपणे आपले विचार मांडणे, वैचारिक घुसळण होणे यासाठी हे व्यासपीठ असेल. भारतीय संविधानावर निष्ठा असणाऱ्यांसाठी हे व्यासपीठ हक्काने उपलब्ध असेल. या उपक्रमाचा एक भाग म्हणून 'विचार वेचे' या नावाने विचारवंत आणि कार्यकर्त्यांच्या छोट्या भाषणांच्या दृक्श्राव्य फिती तयार केल्या आहेत. हे विचार वेचे यू ट्यूबवर सर्वांना मोफत उपलब्ध असतील. विचार वेच्यांचे प्रकाशन सुप्रसिद्ध भाषातज्ज्ञ आणि पुरोगामी विचारवंत **श्री.गणेश देवीं** यांच्या हस्ते होईल. हा कार्यक्रम **नेहरू सांस्कृतिक सभागृह, घोले रोड, पुणे** येथे १३ मे २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता होईल . तरी आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहून लोकशाही जोपासणाऱ्या या उपक्रमाला पाठिंबा द्यावा.

आपले,
विचार वेधी

# पाणी मागतात ... च्यायला

***प्रदीप पुरंदरे***

लोकं उद्धट व्हायला लागली आहेत
पाणी मागतात - पिण्याकरता, शेतीकरता
ठोकून काढलं पायजे साल्यांना

साहेबांनी म्हटलं- अहो, जलनीती घ्या
कायदे करू, नियम करू
येगळं प्राधिकरनच देतो की
पन ह्यांचं आपलं येकच
पाणी मागतात ...च्यायला

सायबांनी असंबी म्हटलं
नदीजोड व्हायला पायजेल आहे
कोर्टाचा आदेशच आहे तसा
पश्चिमेच्या नद्या फिरवू की पुर्वेला
ह्ये अशी वळवायची नदी अन ह्यो उचलायची
पन ह्यांचं आपलं येकच
पाणी मागतात ...च्यायला

कान इकडं करा तुमाला म्हणून सांगतो
साहेब म्हनाले- इन्टरनल शिक्युरिटिला लै धोका आहे
आता टँकरवर काम भागणार नाही, राजेहो
साहेब तर म्हनतात- आता टँकच बोलवा
टँक. टॅक. रणगाडा ! धडाधडा....
पाणी मागतात ... च्यायला

साहेब जाऊन आले परवा चायनाला
केवढी प्रगती केली राव त्यांनी - थ्री गारजेस
सायबाला विचारलं एवढं सगळं जमवलं कसं त्यांनी?
साहेब म्हनले - पयले तियानमेन केलं. तियानमेन! ते मेन!!
आपण काहीच करत नाही. कशी होणार प्रगती?
पाणी मागतात ... च्यायला